दैनिक अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक

# राष्ट्र सह्याद्री

● संपादक : काकासाहेब नवले ● RNI No. MAHMAR /2019/82605 ● वर्ष ६ वे ● अंक १९७ ● शनिवार, २६ एप्रिल २०२५ ● www.rashtrasahyadri.com ● पाने ६ ● मूल्य रु. ४.००



अविनाश शिरसाठ
७०६६७७४४७७
गुरु एन्टरप्रायजेस
सी.सी.टी.व्ही. विक्री आणि सेवा
सी.सी.टी.व्ही. कॅमेराचे संपुर्ण समस्या खात्रीशिर सोडविल्या जातील.
इंदिरानगर, दत्ता मंदिरा मागे, एयरटेल टॉवर शेजारी, श्रीरामपूर-४१३७०९


## परवानगीशिवाय ऑफिस सोडले तर निलंबन : महसूल मंत्री

**पुणे :** पुर्वपरवानगीशिवाय कार्यालय सोडणाऱ्या कर्मचारी व अधिकाऱ्यांवर निलंबनासह शिस्तभंगात्मक कारवाई करण्याचे आदेश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. यामुळे महसूल विभागात एकच खळबळ माजली आहे. महसूल विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयांतील तहसीलदार ते अप्पर जिल्हाधिकारी, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक तसेच भूमी अभिलेख विभागाचे जमाबंदी आयुक्त व संचालक यांच्या अधिनस्थ काही अधिकारी वारंवार विनापरवानगी मुख्यालयात गैरहजर **(पान ४ वर)**


## झापुक । zupuk

आता घरात घुसून
मारायची आली
आहे वेळ
उध्वस्त करून
टाकायला हवा
आतंकी खेळ
कितीही गोंजारले
तरीही कुत्र्याचे शेपूट
असतेच वाकडे
चांगला धडा शिकवल्या
शिवाय जागेवर येणार
नाही पाकडे

**नवनाथ कुताळ,**
**9422231825**

# भारत पाकिस्तानला थेट भिडणार?

## ✻ शस्त्रसंधी करार रद्द करण्याचा सरकारचा विचार;
## ✻ काँग्रेससह सर्व विरोधी पक्षांचा सरकारला पाठिंबा



**नवी दिल्ली:** जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत सरकारने आक्रमक पवित्रा स्वीकारला आहे. या भ्याड हल्ल्यात अनेक निष्पाप पर्यटकांचा जीव गेला असून, देशभरात संतापाची लाट उसळली आहे. या पार्श्वभूमीवर भारत सरकारकडून शस्त्रसंधी करार रद्द करण्याचा विचार सुरू असून, हे पाऊल थेट युद्धाच्या दिशेने जाणारे ठरू शकते.

भारत सरकार शस्त्रसंधी करार रद्द करण्यावर गांभीर्याने विचार करत आहे. २०२१ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात झालेल्या शस्त्रसंधीनंतरही पाकिस्तानने अनेकदा नियंत्रण रेषेवर गोळीबार करत शस्त्रसंधीचे उल्लंघन केले आहे. दहशतवादी गट जसे की लष्कर-ए-तोयबा आणि जैश-ए-मोहम्मद यांच्याकडून काश्मीरमध्ये सतत घुसखोरी होत असल्याने सरकारने आता निर्णायक कारवाईचा विचार सुरू केला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आधीच स्पष्ट इशारा दिला आहे की, पहलगाम हल्ल्याच्या सूत्रधारांना कुठेही लपले असले तरी भारत त्यांना शोधून काढेल आणि शिक्षा देईल. याआधीच भारताने सिंधू जल करार रद्द करून पाकिस्तानला धक्का दिला आहे. आता शस्त्रसंधी हटवून थेट लष्करी कारवाईची तयारी सुरू असल्याचे संकेत दिले जात आहेत.

गुरुवारी दिल्लीत झालेल्या सर्वपक्षीय बैठकीत संरक्षणमंत्री आणि गृहमंत्री यांनी पहलगाम हल्ल्याविषयी सविस्तर माहिती दिली. केंद्र सरकारने घेतलेल्या निर्णयांवर चर्चा करताना विरोधकांनीही राष्ट्रीय सुरक्षेच्या मुद्द्यावर एकात्मता दर्शवली. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी स्पष्टपणे सांगितले की, केंद्र सरकारने घेतलेल्या निर्णयांना विरोधकांचा पाठिंबा असेल.

दरम्यान, शस्त्रसंधी करार रद्द झाल्यास नियंत्रण रेषेवर भारतीय सैन्य अधिक **(पान ४ वर)**

### बलुचिस्तानला पाकिस्तानपासून वेगळे करणार ?

१९७१ च्या धर्तीवर पाकिस्तानपासून जसा बांगलादेश वेगळा करण्यात आला, तसाच यावेळीही भारत पाकिस्तानचे तुकडे करू शकतो. माजी संरक्षण क्षेत्रातील अधिकाऱ्यांच्या मते, बलुचिस्तानला पाकिस्तानपासून वेगळे करून सर्वात मोठा धक्का दिला जाऊ शकतो. जर हा पर्याय अवलंबला गेला तर भारताला बलुच लिबरेशन आर्मीचाही पाठिंबा मिळेल. बांगलादेशच्या निर्मितीनंतर पाकिस्तानला हा दुसरा सर्वात मोठा धक्का असू शकतो.

# महायुतीत शिंदे सेनेचा परफॉर्मन्स टॉप!

## १०० दिवसांच्या कामाचं ऑडिट; मंत्रालयांची विभागणी ग्रीन, येलो आणि रेड झोनमध्ये होणार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून नव्या सरकारची सूत्रं हाती घेतल्यानंतर पहिल्या १०० दिवसांसाठीचा रोडमॅप जाहीर करण्यात आला होता. हा देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळातली सर्व खात्यांच्या १०० दिवसांतील कामगिरीचा आढावा घ्यायला सुरुवात केली होती. कामगिरीच्या मूल्यमापनाची ही प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली आहे. एकूण ६० विभागांपैकी सर्वात चांगली कामगिरी करणाऱ्या आठ विभागांची निवड करण्यात आली आहे. आता या आठ विभागांमधून पहिले तीन विभाग निवडले जाणार आहेत. त्यात शिंदे सेनेचा वरचष्मा दिसून येतोय.

मुख्यमंत्र्यांनी घेतलेला शंभर दिवसांच्या आढाव्यात मंत्रालयातील आठ विभागांची कामगिरी अव्वल केंद्र सरकारच्या क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडीया या कंपनीकडून प्रत्येक विभागाचं लेखापरीक्षण अर्थात ऑडिट करण्यात आले आहे. या ऑडिटनंतर एकूण ६० विभागांपैकी सर्वात चांगली कामगिरी करणाऱ्या आठ विभागांची निवड करण्यात आली आहे. आता या आठ विभागांमधून पहिले तीन विभाग निवडले जाणार आहेत. येत्या आठवडाभरात महायुती सरकारमधील सर्वात चांगली कामगिरी करणारे तीन विभाग कोणते असतील, याचा निकाल जाहीर केला जाईल. तर इतर विभागांना कलर कोड देऊन कामगिरी सुधारण्यासाठी वेळ दिला जाणार आहे. या विभागांची ग्रीन झोन, यलो झोन आणि रेड झोन अशी विभागणी केली जाईल. चांगली कामगिरी असणारे विभाग ग्रीन झोनमध्ये, मध्यम कामगिरी असणारे विभाग यलो झोनमध्ये आणि खराब कामगिरी असणारे विभाग रेड झोनमध्ये अशाप्रकारे ही वर्गवारी असेल.

दरम्यान, क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडियाने चांगल्या **(पान ४ वर)**

### कार्यक्षम आठ मंत्रालये

१)सार्वजनिक बांधकाम विभाग- एकनाथ शिंदे २)परिवहन विभाग- प्रताप सरनाईक ३)महिला व बालविकास विभाग- आदिती तटकरे ४)ग्रामविकास विभाग- जयकुमार गोरे ५)उर्जा विभाग- देवेंद्र फडणवीस ६) सार्वजनिक आरोग्य विभाग- प्रकाश आबिटकर ७)उद्योग विभाग- उदय सामंत ८)गृहनिर्माण विभाग- एकनाथ शिंदे

## महत्वाचे...

### दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानी नागरिकांची झाडाझडती

**कोल्हापूर :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने अत्यंत आक्रमक पवित्रा घेताना पाकिस्तानी नागरिकांना दिलेले सर्व व्हिसा रद्द केले आहेत. तसेच आपल्या नागरिकांना पाकिस्तानात प्रवास न करण्याचा सल्ला दिला आहे. पहलगाममध्ये निष्पाप २६ पर्यटकांची हत्या करण्यात आल्यानंतर देशात संतापाची लाट पसरली आहे. भारताने १९६० मधील सिंधू जल करार रद्द केला आहे. अटारी येथील एकमेव कार्यरत जमीन सीमा क्रॉसिंग सुद्धा बंद केलं आहे. भारत सरकारने तत्काळ प्रभावाने पाकिस्तानी नागरिकांना व्हिसा सेवा निलंबित करण्याचा निर्णय घेतला आहे, असे मंत्रालयाने म्हटले आहे. पाकिस्तानी नागरिकांना दिलेले सर्व वैध व्हिसा २७ एप्रिलपासून रद्द करण्यात आले आहेत, तर पाकिस्तानी नागरिकांना दिलेले वैद्यकीय व्हिसा २९ एप्रिलपर्यंत वैध राहतील, असे मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे. भारतात सध्या असलेल्या सर्व पाकिस्तानी नागरिकांना व्हिसाची मुदत संपण्यापूर्वी भारत सोडावे लागेल, असे मंत्रालयाने म्हटले आहे.

### लष्कर-ए-तोएबाचा कमांडर ठार

**जम्मू काश्मीर :** बांदीपोरा जिल्ह्यातील कुलनार बाजीपुरा भागात दहशतवादी असल्याची माहिती सुरक्षा दलाच्या अधिकाऱ्यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारावर सुरक्षा दलांच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेत परिसराला घेराव घातला आणि शोध मोहीम सुरू केली. लपलेल्या दहशतवाद्यांनी सुरक्षा कर्मचाऱ्यांवर गोळीबार केला. या चकमकीत लष्कर-ए-तोएबाचा कमांडर अल्ताफ लल्ली ठार झाला. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत सरकारसोबत भारतीय सैन्य देखील ॲक्शन मोडमध्ये आहे. पहलगाम हल्ल्याचा पहिला बदला भारतीय जवानांकडून घेण्यात आला आहेत.

# शरदचंद्र पवार राष्ट्रवादीतील सर्व प्रवक्त्यांच्या नियुक्त्या रद्द

## महेश तपासे-जितेंद्र आव्हाड यांच्यातील वाद चव्हाट्यावर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात अंतर्गत खदखद चव्हाट्यावर आली आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी तडकाफडकी आदेश काढत सर्व प्रवक्त्यांच्या नियुक्त्या रद्द केल्या आहेत. या निर्णयामागे पक्षाचे मुख्य प्रवक्ते महेश तपासे आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यातील पानिपत स्मारकाच्या मुद्द्यावरून झालेला वाद कारणीभूत असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

१६ एप्रिल रोजी झालेल्या पक्षाच्या बैठकीत पानिपत येथे सरकारतर्फे प्रस्तावित शौर्य स्मारकाला समर्थन न देण्याची भूमिका जितेंद्र आव्हाड यांनी मांडली होती. मात्र, मुख्य प्रवक्ते महेश तपासे यांनी त्यांच्या भूमिकेला कडाडून विरोध करत स्मारकाला पाठिंबा जाहीर केला होता. तपासे यांचे आजोबा, माजी राज्यपाल गणपत तपासे यांनी यापूर्वीच पानिपत येथे शौर्य स्मारक उभारले आहे. त्यामुळे तपासे यांनी सरकारच्या स्मारकाला पाठिंबा देऊन पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांची नाराजी ओढवून घेतली होती. सूत्रांच्या माहितीनुसार महेश तपासे यांना मुख्य प्रवक्तेपदावरून हटवण्यासाठी सर्व प्रवक्त्यांच्या नियुक्त्या रद्द करण्याचा डाव खेळण्यात आला.

हा वाद पक्षातील अंतर्गत गटबाजी आणि मतभेदांचे द्योतक मानला जात आहे. शरद पवार गटाने २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत १० पैकी ८ जागा जिंकून दमदार कामगिरी केली असली तरी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी पक्षातील ही खदखद चिंतेची बाब ठरू शकते. जयंत पाटील यांनी नियुक्त्या रद्द करताना कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही. मात्र हा निर्णय पक्षाची एकजूट दाखवण्याच्या प्रयत्नांचा भाग **(पान ४ वर)**

# मालेगावातील बांगलादेशी घुसखोरांवर ईडीचे छापे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मालेगाव :** ईडीकडूनमालेगावमध्ये मोठे सर्च ऑपरेशन राबवले जात आहे. मालेगावात ईडीकडून तब्बल ९ ठिकाणी छापेमारी करण्यात आली आहे. बोगस जन्म दाखला प्रकरणात अटक असलेले तव्वाब शेख यांच्या राहत्या घरी ईडीने छापा टाकला आहे. यामुळे मालेगावात एकच खळबळ उडाली आहे. मालेगाव महापालिकेच्या जन्म-मृत्यू नोंदणी विभागात कार्यरत असलेले तव्वाब शेख हे बोगस जन्म दाखला प्रकरणात अटकेत आहे. आता ईडीने त्यांच्या राहत्या घरी छापा टाकून झाडाझडती सुरू केली आहे. तर ईडीकडून मालेगाव शहरात एकूण ९ ठिकाणी एकाच वेळी छापेमारी करण्यात आली. महाराष्ट्र पोलिसांकडून दाखल करण्यात आलेल्या १६ वेगवेगळ्या एफआयआरच्या अनुषंगाने ईडीकडून गुन्हा दाखल करण्यात आला होता. ईडीने या प्रकरणी मनी लॉंड्रिंग प्रतिबंधक कायद्यांतर्गत (झचङ) गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा अवैध बांगलादेशी नागरिकांशी थेट संबंध असल्याचे तपासात समोर आलं आहे. या संपूर्ण प्रकरणाची सुरुवात माजी खासदार किरीट सोमय्या **(पान ४ वर)**

# स्वातंत्र्य सैनिकांविरोधात बोलू नका

## सुप्रीम कोर्टाने राहुल गांधींना फटकारले



**अकोला :** स्वातंत्र्यवीर सावरकर अवमान प्रकरणात लोकसभा विरोधी पक्षनेते तथा राहुल गांधी यांच्याविरुद्ध लखनौ न्यायालयाने जारी केलेल्या समन्सला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली. सर्वोच्च न्यायालयाने राहुल गांधींना बेजबाबदार विधाने करू नका असा इशाराही दिला. जर भविष्यात त्यांनी पुन्हा असे विधान केले तर न्यायालय त्या विधानाचे दखल घेईल असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

न्यायालयाने म्हटले की, 'तुम्ही महाराष्ट्रात असे विधान केले. तिथे लोक त्यांची पूजा करतात. तुमच्या आजीनेही सावरकरांचे कौतुक करणारे पत्र लिहिले होते. महात्मा गांधी जेव्हा ब्रिटीश अधिकाऱ्यांना पत्रे पाठवत असत तेव्हा ते लिहित असत, तुमचा विश्वासू सेवक. तर त्यामुळे तुम्ही महात्मा गांधींना इंग्रजांचे सेवक म्हणणार का? स्वातंत्र्यसैनिकांचा अपमान करणे चुकीचे आहे. सुमारे अडीच वर्षांपूर्वी राहुल गांधी यांनी अकोल्यात सावरकरांबद्दल एक विधान केले होते. त्यावेळी ते काँग्रेसच्या भारत जोडो यात्रेत होते आणि ही यात्रा महाराष्ट्रातून जात होती. १७ डिसेंबर २०२२ रोजी ते (पान ४ वर)

# सेल्फी काढताना शेततळ्यात बुडून आठवीच्या विद्यार्थ्यांचा मृत्यू

**पाथर्डी:** तालुक्यातील देवी धामणगाव येथे गुरुवारी सायंकाळी



हृदयद्रावक घटना घडली.सेल्फी काढताना शेततळ्यात बुडून आठवीत शिकणाऱ्या तेरा वर्षीय मुलाचा मृत्यू झाला.आर्यन बाळासाहेब जाधव (वय -१३) असे मृत मुलाचे नाव असून,या घटनेने संपूर्ण गावात शोककळा पसरली आहे.आर्यन आपल्या वडिलांसोबत देवी धामणगाव येथील शेतात गेला होता.तेथे असलेल्या शेततळ्यावर सेल्फी काढत असताना त्याचा मोबाईल पाण्यात पडला. मोबाईल काढण्यासाठी आर्यन शेततळ्यात पडला,आपल्या मुलाला बुडताना पाहून वडील बाळासाहेब जाधव यांनी तात्काळ पाण्यात उडी घेतली.मात्र, त्यांनी आर्यनला वाचवण्याचे सर्वतोपरी प्रयत्न केले.तोपर्यंत आर्यनचा श्वास थांबला होता.या घटनेत बाळासाहेब जाधव सुद्धा पाण्यात अडकल्यामुळे जखमी झाले.एका शेतकऱ्याच्या मदतीने त्यांना शेततळ्यातून बाहेर काढले.**(पान ४ वर)**

# धार्मिक अधिकारांमध्ये कोणताही हस्तक्षेप नाही

## वक्फ प्रकरणी केंद्र सरकारचे सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली :** वक्फ कायद्याचे समर्थन करताना केंद्र सरकारने गेल्या १०० वर्षांपासून वक्फ संस्थांना केवळ नोंदणीच्या आधारे मान्यता दिली जाते, तोंडी स्वरूपात नव्हे, असे स्पष्ट करून मुस्लिमांच्या धार्मिक अधिकारांमध्ये कुठलाही हस्तक्षेप करण्यात आला नसल्याचे प्रतिज्ञापत्र सर्वोच्च न्यायालयात सादर केले.

वक्फ ही मुसलमानांची धार्मिक संस्था नसून एक कायदेशीर संस्था (वैधानिक निकाय) आहे. वक्फ सुधारणा कायद्यानुसार 'मुतवल्ली'चे कार्य धर्मनिरपेक्ष असते, धार्मिक नाही. हा कायदा लोकप्रतिनिधींच्या भावनांचा आदर करून बहुमताने मंजूर करण्यात आला आहे. या विधेयकाच्या मंजुरीपूर्वी एकूण ३६ संयुक्त संसदीय समितीच्या बैठकांचं आयोजन करण्यात आलं होतं.९७ लाखांहून अधिक सूचना व निवेदने दिली होती. या समितीने देशातील दहा मोठ्या शहरांचा दौरा करून थेट जनतेच्या भेटी घेत त्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या होत्या, असं स्पष्टीकरण प्रतिज्ञापत्रात देण्यात आलं आहे.

या सुधारणा कायद्यामुळे कोणत्याही व्यक्तीच्या वक्फ निर्माण करण्याच्या धार्मिक अधिकारात कोणताही हस्तक्षेप होत नाही. या कायद्यात फक्त वक्फ मालमत्तेच्या व्यवस्थापनात पारदर्शकता आणि कार्यक्षमतेसाठी बदल करण्यात आले आहेत,सध्या तरी या सुधारित




कायद्याच्या कोणत्याही तरतुदीवर तात्पुरती स्थगिती लागू करू नये, अशी विनंती सरकारने न्यायालयाला केली आहे.

भारतात वक्फ कायदा हा मुस्लिम समाजाच्या सामाजिक आणि आर्थिक कल्याणासाठी महत्त्वाचा मानला जातो. परंतु अलीकडे या कायद्याच्या वैधतेवर आणि त्याच्या अंमलबजावणीच्या पद्धतीवर प्रश्न उपस्थित झाले आहेत. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केलं आहे.

### वक्फ संस्था ही धार्मिक नसून कायदेशीर

वक्फ मालमत्तेची मान्यता तोंडी नाही, केवळ नोंदणीच्या आधारे मान्यता मिळते. मुतवल्ली (वक्फ मालमत्तेचा व्यवस्थापक) याचे काम धर्मनिरपेक्ष असते, धार्मिक नाही. वक्फ कायदा लोकप्रतिनिधींनी संसदेत बहुमताने मंजूर केला आहे, तो एखाद्या धर्माच्या बाजूने झुकणारा नाही. वक्फ कायदा १९५४ मध्ये प्रथम लागू झाला. त्यानंतर १९९५ आणि नंतर २०१३ मध्ये त्यामध्ये सुधारणा करण्यात आली. सध्या वक्फ मालमत्तांचा वापर, व्यवस्थापन व देखरेखीची जबाबदारी वक्फ बोर्डांकडे असते. काही याचिकांमध्ये आरोप करण्यात आला आहे की वक्फ कायद्यामुळे मालमत्तेच्या मालकीवर एकतर्फी दावा केला जातो. कायद्यामुळे अन्य धर्मीयांच्या हक्कांवर गदा येते, असा दावा काही याचिकाकर्त्यांनी केला आहे. वक्फ बोर्डांना विशेष अधिकार दिल्यामुळे त्याचा दुरुपयोग होण्याची शक्यता अधोरेखित करण्यात आली आहे.

# एसटी महामंडळासाठी नवीन बस संजीवनी : परिवहनमंत्री सरनाईक



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नागपूर :** आर्थिक कोंडीत सापडलेल्या एसटी महामंडळाला ऊर्जित अवस्थेत नेण्यासाठी नवीन बसेस 'संजीवनी'चे काम करेल, असा विश्वास परिवहन मंत्री तथा एस टी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला.परिवहन मंत्र्यांनी शुक्रवारी मंत्रालयातील नवीन दालनात प्रवेश करत महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांच्याशी अनौपचारिक चर्चा करत कामगारांच्या मुद्यांवरही चर्चा केली.

याप्रसंगी परिवहन आयुक्त विवेक भिमनवार, परिवहन सहसचिव किरण होळकर, एसटी महामंडळाचे वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी गिरीश देशमुख व इतर अधिकारी उपस्थित होते. करोनाच्या कठीन काळापासून आर्थिक अडचणीमुळे एसटीच्या ताफ्यात नवीन बसेस दाखल झाल्या नाहीत. त्यामुळे जुन्या बसेस नव्या करून त्याद्वारे प्रवासी वाहतूक करण्याचा एसटीचा केविलवाना प्रयोग आता थांबवण्यात आला पाहिजे, असे बरगे यांनी परिवहन मंत्र्यांना सांगितले.

दरम्यान दरवर्षी ५ हजार याप्रमाणे येत्या ५ वर्षात २५ हजार बसेस एसटीच्या ताफ्यात दाखल करण्याचे आमचे नियोजन असून यंदा किमान ८ हजार बसेस तफ्यात दाखल होतील, असा विश्वास मंत्री सरनाईक यांनी यावेळी महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसच्या शिष्टमंडळाशी बोलतांना व्यक्त केला. सध्या २ हजार ६४० नवीन लालपरी बसेस एसटीच्या ताफ्यात दाखल होण्याची प्रक्रिया सुरु आहे. त्यापैकी १ हजार २०० बसेस एसटीच्या ताफ्यात आतापर्यंत दाखल झाल्या. **(पान ४ वर)**

### पाच हजार बसेसची निविदा प्रक्रिया लवकरच

यावर्षी एसटी महामंडळाकडून आणखी ५ हजार बसेस खरेदी करण्याची निविदा प्रक्रिया सुरू करण्यात येत आहेत. त्यामुळे एक वर्षामध्ये एसटीच्या ताब्यात सुमारे८ हजार नवीन बसेस दाखल होतील, असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी यावेळी संघटनेच्या शिष्टमंडळाकडे केले.

### प्रत्येक महिन्याला वेळेवर वेतन

एसटी कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात केलेली पीएफची रक्कम पीएफ ट्रस्टकडे का भरण्यात आली नाही. त्या मुळे गुंतवणुकी वरील व्याज बुडत आहे असा प्रश्न सुद्धा वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी गिरीश देशमुख यांना विचारून सदरची माहिती तत्काळ देण्याच्या सूचनाही सरनाईक यांनी दिल्या. या शिवाय प्रत्येक महिन्याला वेळेवर वेतन देण्यासाठी स्वतः पुढाकार घेऊ असे आश्वासनही सरनाईक यांनी यावेळी शिष्टमंडळाशी बोलतांना दिल्याचेही बरगे यांनी सांगितले.

# विखे पॉलिटेक्निकच्या १४७ विद्यार्थ्यांची बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवड

## ग्रामीण मुलांना मिळते नोकरीतून चांगले पॅकेज

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील पद्मश्री विखे पाटील पॉलिटेक्निकच्या १४७ विद्यार्थ्यांना बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये शिक्षण पूर्ण होण्यापूर्वीच नोकरीची संधी उपलब्ध झाली आहे. गेल्या वर्षभरात पॉलिटेक्निकच्या विविध अभ्यासक्रमातील शेवटच्या वर्षातील विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष मुलाखतीमार्फत निवड झाल्याची माहिती प्राचार्य डॉ. व्ही. आर. राठी यांनी दिली.




घारडा केमिकल्स, जीएमसीसी एम आयडीया, सुपा, बजाज ऑटो लिमिटेड, चाकण, आयएफबी रांजणगाव, विटगेन ग्रुप दौंड, किर्लोस्कर न्युमॅटीक्स हडपसर पुणे, बॉश चासिस चाकण, धूत ट्रान्समिशन, पुणे, सोपण ग्रुप पुणे, लक्ष्मि कन्स्ट्रक्शन्स, कोल्हापूर, एक्साईड बॅटरी अहिल्यानगर, सन फार्मा, सिप्ला फार्मास्युटिकल्स, कुरकुंभ, रिलायन्स इंडस्ट्रीजलि, पाताळगंगा, एपिटोम कॉम्पोनंट्स लि, सुपा, पीजी टेक्नोप्लास्ट सुपा अशा विविध १६ कंपन्यांमधून विखे पाटील पॉलिटेक्निकच्या १४७ विद्यार्थ्यांना नोकरीची संधी प्राप्त झाली आहे. अनेक कंपन्यांचे अधिकारी यांनी विद्यार्थ्यांच्या मुलाखती दरम्यान ग्रामीण भागातील या विखे पाटील पॉलिटेक्निकचे विद्यार्थी कुठेही कमी पडत नसल्याचे सांगत विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचे कौतुक केले.

**कंपन्यांबरोबरचे शैक्षणिक करार आणि माजी विद्यार्थ्यांच्या सहकार्याने प्रवरेतील विद्यार्थ्यांचा परिपूर्ण विकास होत आहे. परिणामी प्रवरेतील विद्यार्थी उद्योजक होताना दिसत असून अनेकांना उत्तम नोकरीदेखील प्राप्त होत आहे.**
**– डॉ. सुष्मिता विखे पाटील, सीईओ, प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था, प्रवरानगर**

संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या कल्पक नेतृत्वामुळे विविध कंपन्याबरोबरच्या शैक्षणिक करारानुसार परिसर मुलाखतींसाठी बहुराष्ट्रीय कंपन्याचा मोठा प्रतिसाद मिळत असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली माजी विद्यार्थ्यांचाही सहभाग व प्रोत्साहन मिळत असल्याने विद्यार्थ्यांना नोकरी मिळण्यासाठी यशस्वी प्रयत्न होत असल्याचे प्राचार्यराठी यांनी सांगितले.

मुलाखतीसाठी समन्वयक प्रा. मनोज परजणे, ट्रेनिंग प्लेसमेंट आधिकारी प्रा. राजेंद्र निंबाळकर, विभाग प्रमुख व सर्व विभागातील प्लेसमेंट समन्वयक यांनी परिश्रम घेतले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, अण्णासाहेब म्हस्के पाटील, शालिनीताई विखे पाटील, डॉ. सुजय विखे पाटील, डॉ. सुष्मिता विखे पाटील, भारत घोगरे, डॉ. शिवानंद हिरेमठ, प्राचार्यराठी यांनी अभिनंदन केले.

**फार्मसीच्या नऊ विद्यार्थ्यांनाही नोकरी**

**इन्स्टिटयूट ऑफ फार्मसीच्या नऊ विद्यार्थ्यांची मार्क्सन फार्मा कंपनीत नोकरीसाठी निवड झाली असल्याचे प्राचार्य डॉ.रवींद्र जाधव यांनी सांगितले. भागवत धुळसौंदर, आशिष केदार, आदिल बागवान, कुणाल अंत्रे, हर्षल कदम, यश खंडागळे, सिद्धांत ब्राम्हणे, महावीर भिसे आणि आकाश गवळी यांची निवड झाली आहे. फार्मसीचे संचालक डॉ. बी. एम. पाटील, ट्रेनिंग अँड प्लेसमेंटचे डॉ. मनोज परजणे, महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी प्रा. अर्चना राजदेव यांनी निवडीसाठी विशेष परिश्रम घेतले. अभिनंदन केले आहे.**

द•ख•ल

# दहशतवादी हल्ल्यातील मृतांना श्रध्दांजली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**गंगापूर** : काश्मीर, पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्यात मृत्यूमुखी पडलेल्या भारतीय पर्यटकांना भावपूर्ण गंगापूर येथील दुय्यम निबंधक कार्यालयात मेणबत्त्या लावून दोन मिनिटे मौन पाळून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाममध्ये २१ एप्रिल रोजी झालेल्या या हल्ल्यात भारतीय तसेच परदेशी पर्यटकांवर गोळीबार करण्यात आला होता. या हल्ल्यात २८ लोकांचा मृत्यूझाला आहे.या घटनेत काही जण जखमी झाले आहेत. या हल्ल्यानंतर देशभर संतापाची लाट पाहायला मिळत आहे.यावेळी दुय्यम निबंधक रसुल सय्यद, लिपिक शिरीष झोटींग, सुरेश नरोडे, कैलास साठे,तुषार गिरसे, राजु गायकवाड,कीशोर सोनवणे, दस्त लेखक मुन्ना भाई, शिवप्रसाद बन्सोड,लालाशेख,आसीफ पठाण, विनोद बाविस्कर आदी उपस्थित होते.

# मंदिर पाडप्रकरणी जैन समाजाचे प्रशासनाला निवेदन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : मुंबई येथील विलेपार्ले मधील पूर्वस्थित जैन मंदिर पाडून ते उधस्त करण्यात आले असून सदरचे मंदिर शासनानेच खर्च करून त्याची पुन्हा उभारणी करण्यात यावी अशा मागणीचे निवेदन तालुका जैन समाजाच्या वतीने तहसीलदार व पोलीस निरीक्षक



यांना देण्यात आले.

१६ एप्रिलला २६ वर्षे पुरातन असे श्री १००८ पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिरफ येथे पोलीस बळाचा अनाधिकृत पद्धतीने वापर करून पाडण्यात आले. त्यामुळे जैन समाजात संतापाची लाट उसळली आहे. हे मंदिर सन १९९८ मध्ये सर्व रितशीर पद्धतीने परवानगी घेऊन जैन परंपरेनुसार शांततेच्या मार्गाने त्याची स्थापना करण्यात आली होती. इतके प्राचीन मंदिर अगदी दादागिरी पद्धतीने जमीनदोस्त करण्यात आले व त्या कारणाने जैन समाजात शासनाविरोधात नाराजी पसरली आहे. देशातील सकल जैन समाजाकडून प्रशासनाला निवेदन देण्यात आले आहे .त्यामुळे या घटनेची दखल घेऊन यामध्ये दोषी असलेल्याअधिकारी वर्गावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी राहुरी तालुका जैन समाजाच्या वतीने करण्यात आली आहे.

निवेदनावर प्रकाश पारख, संतोषकुमार लोढा आनंद देसरडा, राहुल चुत्तर, जितेंद्र लुक्कड, प्रतीक बोरा, संजय बोगावत, मोहनलाल कोठारी, पारस जैन, निलेश चूत्तर, आशिष मुथा, प्रशांत चूत्तर, डॉ. भंडारी, योगेश चूत्तर, भाग्येश सुराणा, किरण सुराणा, प्रशांत नहार, रुपेश सुराणा, अमित राका, सुभाष सावज, राजेंद्र मुथा, किशोर सावज आदीच्या सह्या आहेत.

# उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा राज्यस्तरीय पुरस्काराने गौरव

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**नेवासा** : तालुक्यातील पुनतगाव येथे शिवस्वराज्य बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. अध्यक्षस्थानी सरपंच सुदर्शन वाकचौरे होते. मिसेस इंडिया विजेत्या जज श्वेता परदेशी, गोल्डन मॅन दिलीप खरात, समाजसेविका सिस्टर सीबी जॉन, पुणे येथील अभिनेत्री डॉ. इशिका सूर्यवंशी, माजी सरपंच साहेबराव पवार, बालशिवशाहीर ओवी काळे, अ‍ॅड. सोमनाथ वाकचौरे ,शिवस्वराज्यचे संस्थापक संजय वाघमारे, सचिव रमा वाघमारे, जालिंदर वाकचौरे, बाळासाहेब वाघमारे, नजीक चिंचोलीचे सरपंच वनिता चावरे, बाबासाहेब शिरसाठ, शामराव काळे, शिक्षक मोहिनीराज साळुंके, उदय वाघमारे, प्रज्ञा वाघमारे उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष संजय वाघमारे यांनी स्वागत करून प्रास्ताविक केले. अतिथींचा सन्मान रमा वाघमारे यांच्या हस्ते करण्यात आला. संस्थेचे उपाध्यक्ष बाबासाहेब शिरसाठ यांनी शिवस्वराज्य संस्थेच्या कामकाजाची माहिती दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. शिवशाहीर शांताराम वगदे यांनी डॉ.आंबेडकरांचा पोवाडा सादर केला. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना समाजभूषण, आदर्श शिक्षक, उद्योग रत्न, आदर्श शेतकरी, जिजाऊ माता, आदर्श बचत गट पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

शिवस्वराज्य संस्थेचे मार्गदर्शक पत्रकार सुधीर चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले करून आभार मानले. उपस्थित मान्यवरांसह पुरस्कारार्थींना मिष्टान्न भोजन यावेळी देण्यात आले.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळिवण्यात येते की, मौजे मोरयाचिंचोरे ता. नेवासा येथील शेत जमिन गट नंबर १७१ / १ यापैकी क्षेत्र ० हे ६० याची चतुर्सिमा रेकॉर्ड प्रमाणे सदर जमिनीचे मुळ मालक शोभा लक्ष्मण काळे रा. देहरे ता. राहूरी जि. अ. नगर यांनी वर नमुद मिळकतीचा सौदा आमचे अशिला बरोबर केलेला असून सदर मुळ मालक यांनी सदर सौदया पोटी आम चे अशिलाकडून विसार घेतलेला आहे. तसेच त्यांनी सदरील मिळकत निजोखमी व बोजाविरहीत असल्याचा विश्वास व भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे. तथापी वर नमुद केलेल्या मिळकतीमध्ये कोणत्याही इसमाचे अगर व्यक्तीचे गहाण, दान, लिज, लिन, पोटगी, आरक्षण, नोटरी, मृत्युपत्र, वारस व कोर्ट कारवाई, बँक कर्ज, पतसंस्था, फायनान्स, सावकारकी व इतर कुठल्याही शासकिय अगर निमशासकिय कर्ज बोजे, सोसायटी बोजा अगर इतर कोणतेही कायदेशिर हक्क हितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत आमच्या खालील पत्त्यावर लेखी हरकती नोंदवून त्याबाबत योग्य त्या कागदपत्रासह व पुराव्यानिशी संपर्क साधून आमचे अशिलाची खात्री पटवून द्यावी अन्यथा आमचे अशिल सदर मिळकतीचा कायम खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मग त्याचे होणारे परिणामाची जबाबदारी आमचे अशिलावर राहणार नाही. ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे.

नेवासा

दिनांक : २५/०४/२०२५

नोटीस देणार तर्फे

**अ‍ॅड. एन. एस. जोशी**

नेवासा कोर्ट,


# आंदोलनाआधीच देवळालीकरांना मिळणार मुबलक पाणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : तालुक्यातील देवळाली प्रवरा येथील नगर परिषदेने पाणी कपात केली होती. त्या विरोधात प्रहार संघटनेने आंदोलन केले होते. पाणी कपात थांबवा अथवा पाणीपट्टी कमी करा अशा प्रकारचे निवेदन मुख्याधिकाऱ्यांना देण्यात आले होते. मुख्याधिकाऱ्यांच्या दालनात प्रहार जनशक्ती पक्षाचेवतीने पक्षाचे कार्यकर्ते व नागरिकांसह ठिय्या आंदोलन कण्याचा इशारा दिल्यानंतर तातडीने दखल घेऊन मुख्याधिकारी ऋषिकेश पाटील प्रहारचे जिल्हा उपाध्यक्ष आप्पासाहेब ढूस यांना लेखी पत्र देवून १ मे पासुन पाणी कपात रद्द करण्यात आली असल्याचे कळविले आहे. श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघाचे प्रमुख चंद्रकांत कराळे यावेळी उपस्थीत होते.

निवेदनात म्हंटले होते की, एक तर देवळाली प्रवरा नगर परिषदेने आठवड्यातील एक दिवसाची पाणी कपात तात्काळ बंद करावी. किंवा, त्या बंद दिवसाची पाणीपट्टी कमी करून नागरिकांवर होणारा अन्याय दूर करावा. यासाठी २८ तारखेला आंदोलनही करण्यात येणार होते. मात्र त्याआधीच मुख्याधिकारी पाटील यांनी आंदोलनातील मागणी मान्य करून १ मे पासून विना कपात पाणी देण्याचे मान्य केल्याने ठय्या आंदोलन रद्द करण्यात आले आहे.

आंदोलन यशस्वी करण्यासाठी श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघ क्षेत्र उपप्रमुख किरण पंडित, देवळाली प्रवरा शहर प्रमुख प्रकाश वाकळे, राहुरी फॅक्टरी शहर प्रमुख शरद खांदे, राजेश मंचरे, राहुरी फॅक्टरी महिला शहर प्रमुख रजनी कांबळे, देवळाली प्रवरा महिला शहर प्रमुख भाग्यश्री कदम, महिला शहर उपप्रमुख वंदना कांबळे, सुरेखा शिंदे, राहुरी फॅक्टरी शहर उपप्रमुख गणेश भालके, देवळाली प्रवरा शहर उपप्रमुख अशोक देशमुख, देवळाली प्रवरा व राहुरी फॅक्टरी शहर संघटक इमरान शेख, प्रभाकर कांबळे, सुनील कदम, सुनील सोनवणे, हेमंत विश्वासराव आदींनी प्रयत्न केले.

# गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार कार्य उल्लेखनीय : सावंत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : भारतीय जैन संघटनेच्या माध्यमातून राज्यात झालेल्या गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार हे कार्य उल्लेखनीय आहे. मी स्वत: अनुभवले आहे. खरे तर शासनाचे हे काम आहे. परंतु संघटना या कामात मदत करीत आहे. तालुक्यात गाळयुक्त शिवार कामासाठी शासनाच्या माध्यमातून सहकार्य करण्यात येईल, असे प्रतिपादन उपविभागीय अधिकारी किरण सावंत यांनी केले.

महाराष्ट्र शासनाने पिण्याची पातळी वाढविण्यासाठी गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार ही योजना हाती घेतली आहे. या योजनेच्या माध्यमातून तालुक्यातील ग्रामीण भागातील तलाव, ओढे, नाले आदींचे रुंदीकरण, खोलीकरण व त्यातील निघणारा गाळ शेतकऱ्यांच्या शेतात टाकण्याच्या योजनेच्या प्रचार व प्रसार करण्यासाठी भारतीय जैन संघटनेने जबाबदारी स्वीकारली आहे. त्यासाठी संघटनेने तयार केलेला जलरथ ग्रामीण भागात पाठविण्यास सावंत यांनी हिरवा झेंडा दाखवून प्रारंभ केला.




**श्रीरामपूर : जैन संघटनेच्या माध्यमातून गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेच्या प्रचार व प्रसारासाठी संघटनेने तालुक्यात जलरथ पाठविण्याचा शुभारंभ प्रांताधिकारी किरण सावंत यांच्या हस्ते व तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांच्या उपस्थितीमध्ये करण्यात आला. यावेळी मनसुख चोरडीया, संजय शिंगवी, सुरेशचंद बाठीया, अशोकराव थोरे, पत्रकार रमेश कोठारी, अनिल पांडे, संजय कासलीवाल, ठोळे आदी उपस्थित होते.**

यावेळी तहसीलदार मिलिंदकुमार वाघ उपस्थित होते.

संघटनेने गाळयुक्त शिवार व गाळमुक्त धरणासाठी एक वेबसाईट तयार केली आहे. ग्रामपंचायतीचे मागणी अर्ज, कामाचा तपशील, गाळ वाहून नेणारे लाभार्थी, शेतकऱ्यांची यादी आदी माहिती वेबसाईटमधील पोर्टलमध्ये नमूद केलेली आहे. या वेबसाईटवर मागणी अर्ज नोंदविल्यानंतर कामास शासनाची मंजुरी घेऊन कामाची निविदा दिली जाणार आहे. त्यांचे निर्णय घेण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना असल्याचे जैन संघटनेचे राज्य कार्यकारिणी सदस्य मनसुख चोरडीया व माजी जिल्हाध्यक्ष संजय शिंगवी यांनी सांगितले. संघटनेचे माजी राज्य कार्यकारणी सदस्य सुरेश बाठीया यावेळी उपस्थित होते.

प्रचार व प्रसार जलरथ शुभारंभप्रसंगी जेष्ठ पत्रकार रमेश कोठारी, अनिल पांडे, लघुपाटबंधारेचे अभियंता ठाकरे, दिगंबर जैन समाजाचे अध्यक्ष संजय कासलीवाल, मूर्तीपुजक संघाचे अमित गांधी, राजेश शाह, शिवसेनेचे अशोक भोर, कॉंग्रेसचे ज्ञानेश्वर मुरकुटे, गुलाबचंद झांजरी, महावीर पाटणी, प्रशांत पाटणी, सूर्यकांत कर्नावट, अनिल चुडीवाल, माजी तहसीलदार गुलाबराव पादीर, श्रीधर आदिक व जैन समाजाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# प्रोत्साहन मिळाल्याने गुणवत्ता वाढते: राणी सोनवणे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : विद्यार्थ्यांना जर चांगल्या प्रकारचे प्रोत्साहन मिळाले तर निश्चितपणे त्यांची गुणवत्ता वाढते आणि शाळेचा शैक्षणिक आलेख उंचावतो, असे प्रतिपादन उपप्रादेशिक अधिकारी राणी सोनवणे यांनी केले.

जिल्हा परिषद सेमी इंग्लिश स्कूल माळेवाडी शाळेत नुकताच विद्यार्थ्यांचा गुणगौरव सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला यावेळी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त मुख्याध्यापक भागचंद औताडे होते. विद्यार्थ्यांना वाहतुकीचे नियम आणि रस्त्यावर चालताना घ्यावयाची काळजी याबद्दलही सोनेवणे यांनी मार्गदर्शन केले. अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला संस्कार स्पर्धापरीक्षा मुंबई तसेच साई कलाविष्कार संस्था पुणे यांच्या चित्ररंगभरण परीक्षेत विजेत्या ठरलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह, मेडल, सन्मानपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. चौथी शिष्यवृत्ती परीक्षेत तालुकास्तरीय गुणवत्ता यादीत आलेल्या विद्यार्थ्यांचा, जिल्हास्तरावर निवड झालेल्या आणि तालुका स्तरावर प्रथम आलेल्या सांस्कृतिक स्पर्धेतील बालकलाकारांचाही गुणगौरव करण्यात आला. केंद्रस्तरीय लांब उडी, उंच उडी,धावणे, कथाकथन,आणि वकृत्वस्पर्धेत केंद्रात यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

पोलीस नाईक किरण टेकाळे, गृहरक्षक दलाचे राजेंद्र देसाई, मा. सरपंच सोपानराव औताडे, उपसरपंच भागुबाई घोडके, आयडीबीआय बँकेचे शाखाधिकारी पवन आत्राम, मिथिलेश कुमार, शाळा व्यवस्थापन




समिती उपाध्यक्ष भाऊसाहेब ठाकरे, एकनाथ ठाकरे, सराल्याचे सरपंच शंकर विटेकर, किरण बनसोडे, बबन औताडे,र वींद्र मोहन, प्रकाश मोहन, आशाबाई फुलारे आदी उपस्थित होते.प्रास्तविक उपक्रमशील शिक्षक रज्जाक शेख यांनी केले आणि आभार मुख्याध्यापक राजू भालेराव यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सारिका लोखंडे, मीरा ससाणे, मीनाक्षी जाधव यांनी परिश्रम घेतले.

# युपीएससी परीक्षा उत्तीर्ण होत आईला अनोखी श्रध्दांजली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी** केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत जिल्ह्यातील उमेदवारांनी यशाला गवसणी घातली आहे. संगमनेर तालुक्यातील आश्वी खुर्द येथील सेवानिवृत्त ग्रामसेवकाच्या मुलाने यूपीएससी परीक्षेत यश मिळवले आहे. संगमनेर तालुक्यातून तो एकमेव उत्तीर्ण झाला आहे.



२०२४ मध्ये झालेल्या परीक्षेचा निकाल मंगळवारी जाहीर झाला. या ग्रामसेवक राजेंद्र गायकवाड यांचा मुलगा ऋषीकेशयाने यश मिळविले. ११३२ पदांसाठी ही प्रक्रिया राबवण्यात आली. ऋषीकेशने ६१० वा क्रमांक मिळवत या परीक्षेत चौथ्या प्रयन्तात यश मिळविले. चार वर्षांपासून विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करत होता. ऋषीकेशचे प्राथमिक बाभळेश्वर येथे तर माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संगमनेर येथे तर बी.एस्सी पुणे येथे ूर्ण केले. ऋुषीकेशचा परिवार शिक्षित असून आजोबा कै. बाळकृष्ण गायकवाड. आजी कै. कुसुम गायकवाड, वडील व बहीण सुजल यांच्याकडुन प्रेरणा व पाटबळ मिळाले. आई कै. सुनिता गायकवाड या कृषी सहाय्यक होत्या. दुदैवाने त्यांचे पाच वर्षापूर्वी अपघाती निधन झाले. मात्र त्यांचे स्वप्न होते की ऋषीकेशने स्पर्धा परीक्षा देऊन उच्च पदावर जावे. हे स्वप्न उराशी बाळगून त्याने गेली चार वर्षे दररोज चौदा तास अभ्यासात स्वतःला झोकून दिले. मित्र नातलग यांची साथ लाभत गेली आणि पुणे येथे दोन वर्ष खाजगी संस्थेत अभ्यास केल्यानंतर दिल्ली येथे दोन वर्ष अभ्यास केला. पुणे येथील राहिलेल्या अभ्यासाच्या उणिवा दिल्ली येथे दूर होत गेल्या आईचे स्वप्न, कुटुंबाची साथ, आत्मविश्वास, सातत्याने केलेल्या अभ्यासाने चौथ्या प्रयत्नात हे यश संपादित केले तर भविष्यात पुन्हा परीक्षा देऊन आयएएस होणार असल्याचे ऋषीकेशने गावच्या सत्काराला उत्तर देताना सांगितले.

# विद्यार्थ्यांनी गिरवले आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणाचे धडे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**टिळकनगर**:डहाणूकर इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये विद्यार्थ्यांना अग्निशमन व आपत्ती व्यवस्थापनासंदर्भात माहिती देण्यासाठी व अशा परिस्थितीत स्वतःला व इतरांना सुरक्षित ठेवण्यासाठी श्रीरामपूर नगरपरिषद आपत्ती व्यवस्थापन कर्मचाऱ्यांना निमंत्रित करून अनेक प्रात्यक्षिके दाखविण्यात आली.

शॉर्टसर्किटने लागलेली आग, पेट्रोलने लागलेली आग, घराला लागलेली आग, घरगुती सिलेंडरला लागलेली आग कशाप्रकारे विझवावी. ती आग विझवताना कोणती काळजी घ्यावी याबद्दल मार्गदर्शन, तसेच भूकंप, महापूर यांसारख्या आपत्तीत स्वतःबरोबर इतरांची कशी काळजी घ्यावी यांचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. तसेच अग्निशमन दल व आपत्ती व्यवस्थापन लोकांना संकट काळात कशी मदत करते. त्यासाठी नागरिकांनी कोणती प्राथमिक काळजी घ्यावी. अग्निशमन दल व आपत्ती व्यवस्थापन संकट काळामध्ये कोण – कोणत्या





साधनांचा वापर करून लोकांना मदत करते, ती साधने विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष दाखवण्यात आली व त्यांच्या वापराची माहिती देण्यात आली. या प्रसंगी शाळेच्या इमारतीच्या कोणत्या दरातून कोणत्या वर्गाचे विद्यार्थी अशा आणीबाणीच्या परिस्थितीत बाहेर पडू शकतात याचे मॉकड्रिलसुद्धा घेण्यात आले व एका मिनिटात असेंबलीच्या ठिकाणी मुले परत कसे जमतील याचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांना देण्यात आला. या प्रशिक्षणासाठी श्रीरामपूर नगरपरिषदेचे फायर मन अनिल कदम, दिनेश बागडे, अमित शेळके, ज्ञानदेव माने उपस्थित होते. अनिल कदम यांन ी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देऊन विद्यार्थ्यांचे शंका निरसन केले. हा कार्यक्रम फायर ऑफिसर हेमंत कारले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

## पान १ वरुन

### महायुतीत शिंदे सेनेचा परफॉर्मन्स टॉप!

कामगिरीमुळे निवड केलेल्या खात्यांच्या यादीवर नजर टाकल्यास त्यामध्ये शिंदे गटाचा वरचष्मा दिसून येतो. या आठ विभागांमध्ये शिंदे गटाच्या मंत्र्यांकडे असणारे पाच विभाग, भाजपचे दोन आणि अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या केवळ एका विभागाचा समावेश आहे. त्यामुळे आता या तिघांपैकी कोणत्या पक्षाचा विभाग अव्वल ठरणार, हे बघावे लागेल.

### परवानगीशिवाय ऑफिस सोडले तर निलंबन : महसूल मंत्री

राहत असल्याची तक्रार बावनकुळे यांच्याकडे आली होती. तक्रारींची शहानिशा केल्यानंतर त्यात तथ्य आढळल्याने महसूल मंत्र्यांनी गंभीर दखल घेत संबंधित कर्मचारी व अधिकाऱ्यांवर निलंबनासह शिस्तभंगात्मक कारवाई करण्याचे निर्देश दिले.

### एसटी महामंडळासाठी नवीन बस संजीवनी : परिवहनमंत्री सरनाईक

या बरोबरच नव्याने घेतल्या जाणाऱ्या ३ हजार बसेसची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली असून या बसेस देखील दिवाळी नंतर एसटीच्या ताफ्यात दाखल होण्यास सुरुवात होईल, असेही परिवहनमंत्रयांनी यावेळी बोलतांना शिष्टमंडळाला सांगितल्याचे बरगे म्हणाले.

### स्वातंत्र्य सैनिकांविरोधात बोलू नका

महाराष्ट्रातील अकोला जिल्ह्यात होते. येथे त्यांनी सावरकरांचा उल्लेख 'ब्रिटिशांचा सेवक' असा केला होता ज्यांना ब्रिटिश सरकारकडून पेन्शन मिळत असे.राहुल गांधींच्या वकिलाने सर्वोच्च न्यायालयात सांगितले की, त्यांच्या अशिलाचा कोणालाही चिथावणी देण्याचा हेतू नव्हता. यावर न्यायालयाने म्हटले की, जर त्यांना कोणालाही चिथावणी द्यायची नव्हती तर त्यांनी अशी विधाने का केली. स्वातंत्र्यसैनिकांबद्दल खोटी विधाने करण्याचा अधिकार कोणालाही नाही, असा सक्त सल्ला न्यायालयाने राहुल गांधींना दिला आहे. त्यांनी राहुल गांधींना सांगितले की ते राजकारणी आहेत, मग ते अशी विधाने का करतात, असे करू नका.लखनौ न्यायालयाने जारी केलेल्या समन्सला स्थगिती देताना सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, 'आम्ही हे स्पष्ट करत आहोत की जर अशी विधाने पुन्हा केली गेली तर आम्ही स्वतःहून दखल घेऊ.' स्वातंत्र्यसैनिकांवर भाष्य करण्याचा अधिकार कोणालाही नाही. वकील नृपेंद्र पांडे यांनी तक्रार दाखल केली होती आणि आरोप केला होता की राहुल गांधी यांनी भारत जोडो यात्रेदरम्यान वीर सावरकरांचा जाणूनबुजून अपमान करण्याच्या उद्देशाने हे विधान केले होते. ते म्हणाले की, राहुल गांधी यांचे हे विधान वीर सावरकरांचा अपमान करण्याच्या सुनियोजित कटाचा भाग आहे.

### शरदचंद्र पवार राष्ट्रवादीतील सर्व प्रवक्त्यांच्या नियुक्त्या रद्द

असल्याचे काही नेत्यांचे म्हणणे आहे. दुसरीकडे, तपासे यांच्या समर्थकांनी या कारवाईला 'अन्यायकारक' ठरवले आहे.

या घडामोडींमुळे महाविकास आघाडीतील पक्षांमध्येही चर्चा सुरू झाली आहे. शरद पवार यांनी अद्याप यावर भाष्य केलेले नाही, पण पक्षातील एकजुटीसाठी ते काय पावले उचलतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### भारत पाकिस्तानला थेट भिडणार?

सक्रिय होणार आहे. या निर्णयामुळे पाकिस्तानच्या लष्करावर दबाव वाढेल. तिन्ही सैन्यदलांना आधीच सज्ज राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तर पाकिस्तानकडून संभाव्य सर्जिकल स्ट्राईकची भीती देखील व्यक्त केली जात आहे.

या घटनांच्या पार्श्वभूमीवर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध नव्या टोकाकडे झुकताना दिसत आहेत. राजनैतिक संबंध आधीच ताणले गेले असून, व्यापार, पाणी, व्हिसा, आणि आता शस्त्रसंधी अशा साऱ्या पातळ्यांवर भारत निर्णायक पावलं उचलत आहे. हे सर्व निर्णय पाहता भारत आता पाकिस्तानशी प्रत्येक स्तरावर दोन हात करण्याच्या तयारीत आहे.

### सेल्फी काढताना शेततळ्यात बुडून आठवीच्या विद्यार्थ्यांचा मृत्यू

जाधव कुटुंबातील हे बापलेक देवी धामणगाव येथे यात्रेसाठी पुण्याहून आले होते.मात्र, ही आनंददायी यात्रा त्यांच्या आयुष्यात दुःखद ठरली.या अपघाती मृत्यूने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

### मालेगावातील बांगलादेशी घुसखोरांवर ईडीचे छापे

योच्या तक्रारीनंतर झाली होती. त्यांनी मालेगावातील बनावट दस्तावेजांच्या रॅकेटचा पर्दाफाश केला होता. त्यांच्या पाठपुराव्यानंतरच पोलिसांनी एफआयआर नोंदवून तपास सुरू केला होता. ज्यामुळे आता ईडीकडून सखोल चौकशी होत आहे. आता मालेगावमध्ये ९ ठिकाणी ईडीने छापेमारी केली आहे. आता या छापेमारीत नेमकं काय समोर येणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. दरम्यान, मालेगावमध्ये मोठ्या प्रमाणावर जन्म दाखला घोटाळा झाल्याचा दावा करीत, मालेगाव हे बांगलादेशी रोहिंग्या मुसलमानांना भारतीय करण्याचा अड्डा असल्याचा गंभीर आरोप भाजप नेते किरीट सोमय्या यांनी केला होता. या पार्श्वभूमीवर किरीट सोमय्या हे अनेकदा मालेगाव दौऱ्यावर आले होते. यानंतर शासनाने विशेष पोलिस महानिरीक्षकांच्या अध्यक्षतेखाली एसआयटीची स्थापना केली होती. कामकाजात पुरेसे गांभीर्य न दर्शविता जन्मदाखले निर्गमित करून कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत महसूल व वन विभागाचे सहसचिव अजित देशमुख यांनी तत्कालीन तहसीलदार नितीनकुमार देवरे व विद्यमान नायब तहसीलदार संदीप धारणकर यांना निलंबित करण्यात आले होते.

## पहलगाममधील भ्याड दहशतवादी हल्ल्याचा निषेध

**अहिल्यानगर :** काश्मीर खोऱ्यातील पहलगामजवळील बायसरन परिसरात झालेल्या अमानवी व भ्याड दहशतवादी हल्ल्याचा घर घर लंगर सेवेच्या वतीने निषेध करण्यात आला. या हल्ल्यात बळी पडलेल्या २६ निरपराध नागरिकांना तारकपूर येथील अन्न छत्रालयात भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या श्रद्धांजली कार्यक्रमात जनक आहुजा, हरजितसिंह वधवा, प्रितपालसिंह धुप्पड, राजेंद्र कंत्रोड, सतीश गंभीर, मुन्ना जग्गी, राजू जग्गी, गुलशन कंत्रोड, प्रशांत मुनोत, सनी वधवा, सोमनाथ चिंतामणी, सुनिल थोरात, कैलाश नवलानी, डॉ. संजय असनानी आदी उपस्थित होते. उपस्थितांनी दहशतवादाचा जोरदार निषेध व्यक्त करुन भारत सरकारने याविरोधात ठोस पावले उचलण्याची मागणी केली.

जनक आहुजा म्हणाले की, काश्मीरमध्ये निष्पाप नागरिकांवर अमानुषपणे हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांनी संपूर्ण मानवजातीवरच आघात केला आहे.

# राज्याचा सेपक टकारा संघ जाहीर



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नागपूर :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय म.रा.पुणे व क्रीडा उपसंचालक नागपूर यांच्या वतीने खेलो इंडिया युथ गेम्स बिहार साठी दि. २२ ते २३ एप्रिल रोजी महाराष्ट्र राज्य संघ सेपक टकारा मुले मुली संघाची निवड चाचणी विभागीय क्रीडा संकुल मानकापूर,नागपूर येथे आयोजित करण्यात आली. यात ५४ मुली व २४ मुली चा सहभाग होता. याप्रसंगी उपस्थित क्रीडा उपसंचालक शेखर पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी सौ.धातरे, राज्य सरचिटणीस डॉ.योगेंद्रजी पांडे, निवड समिती सदस्य डॉ.योगेंद्रजी पांडे, डॉ.अमित कन्वर, गणेश माळवे, असिफ बेग, डॉ.विनय मून, रवि बकवाड, उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य सेपक टकारा मुले व मुली संघ असे मुले : शेख फैजान रईस (जळगाव),अनिश लालचंद काजला(नाशिक),मोहम्मद. साद(नागपूर),मोहम्मद जूनेद (नागपूर), सय्यद उवैस,असीम अली(जळगाव), सर्वेश संतोष कुदळे (ठाणे ), मोहम्मद. मोहतशिम अहमद (नागपूर), रोहित जयराम सुर्यवंशी(नांदेड), सय्यद शिकेब सय्यद इम्रान (जळगाव), शिवतेज सुजित कदम(सोलापूर), दर्शन धारपुरे(नागपूर), क्षितिज सुर्यवंशी(नांदेड,)सय्यद उमर(नागपूर),हर्षवर्धन मोरे(नाशिक,)प्रणव राठोड(जालना) मुली: हंसिनी लीलाधर जाधव (नाशिक), रिया कैलास घारटे नाशिक), नेहा संतोष घोलप (ठाणे), प्राची प्रकाश पार्टे(ठाणे), प्रणिती प्रभाकर नागणे (सोलापूर),तेजस्विनी गजानन काळे(नांदेड),हंसिनी लीलाधर जाधव (नाशिक),प्राची प्रकाश पार्टे (ठाणे),रिया कैलास घारटे (नाशिक).

## पहलगाम हत्याकांडाच्या निषेधार्थ हर्ष तनपुरेंच्या नेतृत्वाखाली निवेदन



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** जम्मू काश्मीर येथील पहलगाम येथे दि. २२ एप्रिल रोजी पाकिस्तानी अतिरेक्यांकडून २६ पर्यटकांची निर्घृण हत्या करण्यात आली. या घटनेच्या निषेधार्थ काल २५ एप्रिल रोजी राहुरी येथील शहर युवक काँग्रेस शरद पवार गटाच्या वतीने युवानेते हर्ष तनपूरे यांच्या नेतृत्वाखाली महसूल व पोलिस प्रशासनाला निवेदन देण्यात आले.

तहसीलदार नामदेव पाटील व पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, जम्मू काश्मीर येथील पहलगाम येथे दि. २२ एप्रिल रोजी पाकिस्तानी अतिरेक्यांनी बेछूट गोळीबार करून २६ पर्यटकांची निर्घृण हत्या केली.

या हल्ल्यात सहभागी असलेल्या अतिरेक्यांना तातडीने पकडण्यात येऊन त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. त्याच बरोबर असे अतिरेकी हल्ले रोखण्यासाठी केंद्र शासनाने आवश्यक ती कारवाई करणे गरजेचे आहे. या घटनेचा आम्ही तीव्र शब्दात निषेध व्यक्त करतो. असे निवेदनात म्हटले आहे.

यावेळी बोलताना युवानेते हर्ष तनपूरे म्हणाले कि, जम्मू काश्मीर येथील पहलगाम येथे घडलेली घटना ही माणूसकीला काळीमा फासणारी घटना आहे. आम्ही या घटनेचा निषेध करतो. केंद्र सरकारने ठोस पाऊले उचलावीत. यापूढे असे हल्ले होऊ नयेत, यासाठी सरकारने योजना करावी. कारण सरकारची सगळ्यात मोठी जबाबदारी म्हणजे नागरिकांची सुरक्षा आहे. असे हर्ष तनपूरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

निवेदनावर सुर्यकांत भूजाडी, गजानन सातभाई, बाळासाहेब उंडे, नंदुभाऊ तनपूरे, संजय साळवे, दत्तात्रय कवाने , संतोष आघाव, गणेश कोहकडे, आबा आढाव, दिपक साळवे, राजेंद्र धनवटे, रविंद्र आहेर, किरण साळवे, प्रशांत डौले, भूषण वाबळे, गणेश धाडगे, महेश उदावंत, सौरभ उंडे, महेंद्र मुसमाडे, सचिन राऊत, चंद्रकांत पानसंबळ, भरत बजाज, तुळशीराम कडू, राकेश खाबीया, उत्तम साळवे, अशोक वेताळ, सचिन राऊत,प्रतिक धनवटे, किरण कोरडे, महेश वराळे, विठ्ठल तमनर, सुरज बेलकर आदित्य खाबीया आदिंच्या सह्या आहेत.

## आ.आशुतोष काळेंचा सोमवारी जनता दरबार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी :** सर्वसामान्य नागरिकांना विविध शासकीय कार्यालयात येणाऱ्या अडी-अडचणी समजून घेवून त्या अडीअडचणी सोडविण्यासाठी आ.आशुतोष काळे यांनी जनता दरबार सुरु केल्यामुळे सर्वसामान्य जनतेला मोठा दिलासा मिळाला आहे. जनता दरबाराच्या माध्यमातून नागरिकांच्या प्रश्नांची सोडवणूक होत असल्यामुळे सोमवार (दि.२८) रोजी आ.आशुतोष काळे दुपारी ०२:०० वा. कोपरगाव तहसील कार्यालयात जनता दरबार घेणार आहेत अशी माहिती आ.आशुतोष काळे यांच्या जनसंपर्क कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

मतदार संघातील अनेक नागरिकांचे शासकीय कार्यालयांमध्ये विविध प्रकारची कामे अडलेली असतात. सर्वसामान्य नागरिकांना विविध शासकीय कार्यालयात जोपर्यंत आपले काम पूर्ण होत नाही तोपर्यंत चकरा माराव्या लागतात. नागरिकांना होणाऱ्या या त्रासाची दखल घेवून आ.आशुतोष काळे यांनी २०१९ पासून शासकीय अधिकारी व जनता एकाच वेळी एकाच व्यासपीठावर आणून नागरिकांच्या समस्यांचा सोक्षमोक्ष लावीत आहे. त्यामुळे वर्षानुवर्षापासून नागरिकांची विविध शासकीय कार्यालयात रखडलेली कामे झटपट होवू लागली आहे. सुरुवातीला जनता दरबारात एकाच वेळी सर्व विभागाच्या शासकीय अधिकाऱ्यांना बोलावून घेतले जात होते.परंतु समस्या घेवून येणाऱ्या नागरीकांची होणारी गर्दी पाहता त्यामध्ये अधिकची सुसूत्रता यावी यासाठी आ.आशुतोष काळे यांनी सर्वच शासकीय कार्यालयातील अधिकारी एकाच वेळी न बोलविता टप्या टप्याने विविध विभागाचे अधिकारी जनता दरबारात बोलविले जावून नागरिकांच्या समस्या सोडविल्या जात आहेत.

त्याप्रमाणे सोमवार (दि.२८) रोजी दुपारी ०२.०० वाजता तहसील कार्यालयात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मृद व जल संधारण, जल नि:सारण व जिल्हा परिषद पाणी पुरवठा विभाग आदी विभागाच्या समस्या सोडविण्यासाठी जनता दरबाराचे आयोजन कारण्यात आले आहे. वरील विभागाबाबत ज्या नागरिकांचे प्रश्न, अडचणी असतील ते प्रश्न व अडचणी सोडवण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. नागरिकांनी आपल्या अडचणी व तक्रारी लेखी स्वरूपात मांडाव्या असे आवाहन ना.आशुतोष काळे यांच्या जनसंपर्क कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

### संत निरंकारी मिशनच्यावतीने मानव एकता दिवस व रक्तदान शिबीर उत्साहात

**अहिल्यानगर :** प्रेम आणि बंधुभावना जागविणारा 'मानव एकता दिवस', संत निरंकारी मिशन द्वारे दरवर्षी २४ एप्रिल रोजी बाबा गुरबचनसिंहजी यांच्या पावन स्मृतिप्रित्यर्थ श्रद्धा आणि भक्तिभावनेने परिपूर्ण वातावरणात आयोजित केला जातो. हा दिवस केवळ पुण्यस्मरण करण्याचा प्रसंग नसून मानवता, सौहार्द आणि एकत्वाच्या भावनांचा एक आत्मिक संगम आहे. मानव एकता दिवसाच्या या प्रसंगी मिशन कडून देशभर रक्तदानाच्या एका प्रेरक श्रृंखलेचा शुभारंभ होतो जी नि:स्वार्थ सेवाभावनेच्या सामूहिक जागृतीचे स्वरूप बनून संपूर्ण वर्षभर समाजामध्ये प्रवाहित होत राहते. त्याचबरोबर सत्संग कार्यक्रमांच्या माध्यमातून प्रेम, शांती आणि समरसतेचा प्रकाशदेखील जनसामान्यांपर्यत पोहचविला जातो.

# पहलगामचा भ्याड हल्ला मानवतेला काळीमा फासणारा : आ. हेमंत ओगले



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** काश्मीर येथील पहेलगाम येथे झालेला दहशतवादी हल्ला हा मानवतेला काळीमा फासणारा असून याचा आम्ही तीव्र शब्दात निषेध व्यक्त करत आल्याचे प्रतिपादन आ. हेमंत ओगले यांनी केले.

काश्मीर येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात अनेक निष्पाप भारतीयांना आपला जीव गमवावा लागला अतिशय क्रूरतेने हा हल्ला घडवून आणला याला जशास तसे उत्तर देण्याची गरज असल्याचे करण ससाने यांनी म्हटले.

श्रीरामपूर विधानसभा काँग्रेस कमिटीच्या वतीने काश्मीर येथील पहेलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा प्रांत कार्यालय श्रीरामपूर येथे निषेध करण्यात आला.

यावेळी जिल्हा काँग्रेसचे कार्याध्यक्ष सचिन गुजर म्हणाले की आतंकवाद्यांना कुठलाही जात धर्म किंवा पंथ नसतो ही विकृत प्रवृत्ती असून पहिले पुलवामा आणि आता पहेलगाम अशा दहशतवादी प्रत्युत्तर देण्यासाठी भारताने पाकव्याप्त काश्मीरमध्ये युद्ध पुकारले पाहिजे असे गुजर म्हणाले.

जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मुरकुटे म्हणाले की, काश्मीर येथे झालेल्या भ्याड हल्ल्यामुळे देशभरात संतापाची लाट पसरली असून याबाबत वेळीच उत्तर देण्याची गरज असल्याचे स्पष्ट केले

जिल्हा परिषदेचे माजी सभापती बाबासाहेब दिघे यांनी सदर हल्ल्यात मृत्यूमुखी पावल्यांना श्रद्धांजली वाहत हल्ल्याचा निषेध व्यक्त केला. याप्रसंगी तालुकाध्यक्ष प्रमोद भोसले, शहराध्यक्ष अण्णासाहेब डावखर, माजी उपनगराध्यक्ष राजेंद्र सोनवणे, माजी सरपंच शिवाजी शेजुळ, माजी नगरसेवक पंडित बोंबले, रितेश रोटे, कलीम कुरेशी, के सी शेळके, विलास लबडे, दत्तनगरचे सरपंच प्रेमचंद कुंकूलोळ, सुनील शिरसाठ, रियाज पठाण, वैभव गिरमे, प्रवीण नवले यांच्यासह आदी उपस्थित होते.


Shri Kashi Shikshan Prasark Mandal's

**SHRI GAJANAN MAHARAJ COLLEGE OF NURSING (B.Sc)**

(Recognizes by Govt. of Maharashtra & Affiliated to MUHS, Nashik) At – Bhagur, Tal. Shevgaon, Dist.Ahilyanagar Pin – 414502, Phone No. – 9850766607 / 9423126607.
Email ID – shrigajanannursing@gmail.com

**WANTED**

Applications are invited for filling up the following posts in the above said College / Institute

| SR. | POST | VACANT POST | SUBJECT |
|---|---|---|---|
| 1 | Professor cum Principal | 01 | Any Subject (Open) |
| 2 | Professor cum Vice-Principal | 01 | Any Subject (Open) |
| 3 | Associate Professor | 01 | Pediatric Nursing / Psychiatric Nursing (Open) |
| 4 | Assistant Professor / Lecturer | 02 | Medical Surgical Nursing / Foundation of Nursing / Community Health Nursing / Obstetric Nursing (Open) |
| 5 | Tutor / Clinical Instructor | 09 | Nursing (SC/ST/VJNT/OBC/SEBC/EWS/OPEN) |

**Qualification :-** As per INC & MUHS rules Candidates are invited Applications along with their original documents Before30 /04/ 2025 at Shri Gajanan Maharaj College of Nursing (B.Sc), Bhagur, Tal. Shevgaon, Dist. Ahilyanagar. (414502)

President


## निधन वार्ता..

### मनसुखलाल ठक्कर



श्रीरामपूर : येथील ठक्कर कोल डेपोचे मालक मनसुखलाल विश्रामभाई ठक्कर (वय ७८) यांचे अल्पशा आजाराने गुरूवार दि. २४ एप्रिल रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुली, दोन पुतणे, जावई व नातवंडे असा परिवार आहे. ते विनेशभाई, केशवभाई ठक्कर व मनोज नानालाल ठक्कर यांचे चुलते तसेच सारिका ठक्कर, करुणा राजेश गदीया, भाविका अमोल गवस, भक्ती सोम्मय्या व कुमारी पुजा ठक्कर यांचे ते वडील होते.

## शारदा शाळेचा शिर्डी क्रिकेट ॲकॅडमीवर ३३ धावांनी विजय



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** आजच्या डी एन क्रिकेट मैदानावर शारदा व शिर्डी क्रिकेट ॲकॅडमी या सामन्याची नाणेफेक क्रीडा प्रशिक्षक गौरव डेंगळे यांच्या हस्ते पार पडली. यावेळी बास्केटबॉल प्रशिक्षक गणेश मोरे व क्रिकेट प्रशिक्षक विकास सिंग उपस्थित होते. नाणेफेक जिंकून शारदा इंग्लिश मिडीयम स्कूल, कोपरगावने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.

शारदा स्कूलने २० षटकांत ८ गडी गमावून १२५ धावा केल्या. प्रेम कास्लीवलने दमदार ३३ धावांची खेळी साकारली, तर साईराम शेळकेने १६ धावांचे योगदान दिले. शिर्डी क्रिकेट अक्ॅडमीतर्फे दर्शन खिलारेने प्रभावी गोलंदाजी करत २ गडी बाद केले. जवाबात शिर्डी क्रिकेट अक्ॅडमी संघाला ८ बाद ९२ धावांपर्यंतच मजल मारता आली. गौतम सदावणेने २३ व साईराज गमेने १३ धावा केल्या.

शारदा स्कूलकडून विराट घेगडमलने उत्कृष्ट मारा करत अवघ्या ११ धावांत ४ बळी टिपले आणि संघाच्या विजयात महत्त्वपूर्ण योगदान दिले. शारदा इंग्लिश मिडीयम स्कूल, कोपरगावने शिर्डी क्रिकेट अक्ॅडमीवर ३३ धावांनी विजय मिळवला.

### निमगाव वाघाच्या यात्रेत थरारक कुस्त्यांनी रंगला आखाडा

**अहिल्यानगर :** निमगाव वाघा (ता. नगर) येथील ग्रामदैवत श्री बिरोबा महाराजांच्या यात्रा उत्सवानिमित्त बुधवारी (दि.२३ एप्रिल) कुस्तीचे मैदान लाल मातीच्या आखाड्यातील थरारक कुस्त्यांनी रंगले होते. हलगी-डफाचा निनाद, बजरंग बलीचा जयघोष, आखाड्या भोवती जमलेल्या पंचक्रोशीतील ग्रामस्थांच्या उपस्थितीमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात युवा मल्लांच्या कुस्त्या पार पडल्या. मैदानात झालेल्या चितपट कुस्त्यांनी ग्रामस्थांच्या डोळ्यांचे पारणे फिटले.


## नशिबाची परिक्षा

शनिवार दि. २६ एप्रिल २०२५

**मिलनम डे**

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| २९० ४७० ५६० | १-८ | १७० १८९ ११६ | जोड १४-५८-३२-०७-८९ |

**कल्याण**

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १४० २३० ७८० | ५-७ | १७९ १२४ ११५ | जोड ५१-६७-९७ ८२-३५ |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १२० २३८ ३५५ | ३-६ | १५० १६९ ११४ | जोड ३४-०६-७१-९८-६५ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat |
|---|---|---|---|---|---|---|
| 24/02/2025 to 01/03/2025 | 447 57 269 | 367 65 267 | 136 06 457 | 180 97 179 | 270 93 337 | 690 53 120 |
| 02/03/2025 to 08/03/2025 | 778 21 588 | 460 01 669 | 558 80 677 | 300 39 289 | 129 20 460 | 370 01 370 |
| 10/03/2025 to 15/03/2025 | 789 49 568 | 125 89 469 | 369 83 157 | 156 29 180 | *** ** *** | 130 44 128 |
| 16/03/2025 to 22/03/2025 | 588 82 778 | 244 01 290 | 579 14 347 | 120 33 788 | 160 70 677 | 588 13 670 |
| 23/03/2025 to 29/03/2025 | 111 33 139 | 677 00 334 | 470 10 347 | 890 79 289 | 257 41 155 | 234 96 556 |
| 31/03/2025 to 05/04/2025 | 128 12 336 | 460 04 356 | 880 66 367 | 178 61 560 | 169 62 138 | 235 02 679 |
| 07/04/2025 to 12/04/2025 | 180 91 588 | 247 31 119 | 789 44 239 | 277 63 670 | 345 23 238 | 469 93 689 |
| 14/04/2025 to 19/04/2025 | 257 40 389 | 270 96 268 | 169 62 570 | 169 62 570 | 489 15 168 | 359 76 240 |
| 21/04/2025 to 26/04/2025 | 247 35 500 | 469 91 335 | 149 44 248 | 299 08 459 | | |

✻ वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये ✻

# सरकारी विहिरीचा खासगी वापर सुरु

## गाव करतेय टँकरची मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :-** तालुक्यातील अनेक गावांत विविध पाणी पुरवठा योजनांच्या अंतर्गत गावाला पाणीपुरवठा करण्यासाठी विहीर खोदली गेली मात्र त्यावर खाजगी व्यक्तींनी ताबा घेतल्यामुळे गाव पाण्यापासून वंचित राहत असून गावाकडून मात्र पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची मागणी करत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे .

विविध योजनांचा माध्यमातून ग्रामीण भागातील लोकांना स्वच्छ पाणीपुरवठा व्हावा यासाठी कोट्यवधी रुपयांची उधळण करण्यात आली मात्र तरीही आजपर्यंत अनेक गावांत कोणत्याही प्रकारचा पाणीपुरवठा होत नसल्याने पदाधिकारी यांच्याविषयी मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त होताना दिसत आहे .आपलं गाव आपलं पाणी,राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजना,मागील सरकारच्या त्याचप्रमाणे हर घर नल अश्या विविध योजनांतून विहीर खोदून आपल्या किंवा शेजारच्या गावाला पिण्यासाठी पाईपलाईन च्या माध्यमातून पाणीपुरवठा करण्यासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च सरकारने केला मात्र आज विहीर सोडली तर सगळ काही गायब झाले आहे.

त्यात उरलेल्या विहीर व चक्क शेतकऱ्यांनी ताबा मिळवला असून सरकारी विहिरीतून शेतीला पाणी सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार सुरू असून त्याच गावात पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांची मोठ्या प्रमाणात वणवण सुरु आहे मात्र वादविवाद नको म्हणून ग्रामसेवक यांनी पंचायत समिती कडे चक्क पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची मागणी केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला असून गावातील अनेक नागरिक गटविकास अधिकारी राणी फराटे याच्याशी संपर्क साधून विहिरीवर खाजगी लोकांनी ताबा घेतला असल्याचे माहिती दिली असता त्यांनी तात्काळ ग्रामसेवक यांना बोलावून घेत याबाबत सविस्तर माहिती घेताना त्यांना माहिती मिळाली कि विहिरीवरील मोटारचा स्टाटर चोरीला गेला आहे त्यावर गटविकास अधिकारी यांनी दोषी नागरिक यांच्यावरपोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून कारवाईचे आदेश दिले आहेत .

मात्र ग्रामसेवक गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ करत असल्याचा प्रकार समोर आला आहे.

गळ्याच ठिकाणी खाजगी वापर श्रीगोंदा तालुक्यातील अनेक गावात पिण्याच्या पाण्यासाठी सरकाकडून लाखो रुपये खर्च करून विहिरीचे खोदकाम करण्यात आले त्यावरून काही दिवस पाणी पुरवठा झाल्मातर आता जुन्यातील एकही योजना चालू नसून त्याचे मोटार स्टाटर तसेच विहिरीवर आजूबाजूच्या शेतकऱ्यांनी ताबा घेतला असून ते मालकीच्या सारखे वापर करत असल्याचे अनेक ठिकाणी दिसून येत आहे त्यामुळे सरकारने या विहिरी नेमक्या कोणासाठी खोदल्या होत्या हे मात्र समजू शकले नाही .

---

द•ख•ल

## दोषी कर्मचारी व अधिकाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल : ना .शिरसाट

**जामखेड :-** येथील नव बौद्ध शासकीय मुलांच्या वसतीगृहातील रॅगिंग प्रकरणाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर राज्यभरात संतापाची लाट उसळली आहे. इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी आठवीच्या विद्यार्थ्याला पट्ट्याने मारहाण केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला असून या घटनेची गंभीर दखल राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय संजय शिरसाट यांनी घेतली आहे. या प्रकरणाची माहिती भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे जामखेड तालुका सरचिटणीस तुषार बोथरा यांनी थेट सामाजिक न्यायमंत्री यांना दुरध्वनी वरून या घटनेची माहिती दिली व्हिडिओ पाहिल्यानंतर मंत्री शिरसाट यांनी तत्काळ प्रतिक्रिया देत सांगितले की,सदर व्हिडिओ अत्यंत दु:खद व निंदनीय आहे. यामध्ये दोषी आढळलेल्या प्राचार्य, कर्मचारी तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल.तसेच आर्थिक गैरव्यवहार होत आहेत.या प्रकरणामुळे शिक्षण व सामाजिक क्षेत्रात खळबळ उडाली असून, बालकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने वसतीगृह व्यवस्थापनावर अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. स्थानिक प्रशासन आणि सामाजिक न्याय विभागाच्या संयुक्त तपासानंतर लवकरच पुढील पावले उचलली जातील, असेही मंत्री संजय शिरसाट यांनी स्पष्ट केले.



## जामखेड तालुका रोजगार सहाय्यक संघटनेच्या अध्यक्षपदी हरिभाऊ वराट

**जामखेड :-** तालुका रोजगार सहाय्यक संघटनेच्या तालुका अध्यक्षपदी चौथ्यांदा साकतचे हरिभाऊ वराट यांची बिनविरोध निवड करण्यात आली. दि.२४ रोजी पंचायत समिती जामखेड सभागृह येथे उपस्थित सर्व रोजगार सहाय्यक यांच्या उपस्थिती बैठक झाली. यावेळी जिल्हा अध्यक्ष अनिल गंगावणे ,कर्जत तालुका अध्यक्ष युवराज नवसरे, जिल्हा कार्यकारणी प्रवीण आहेर कोपरगाव,राहुरी मधून जालिंदर रोडे ,कर्जत तालुका सचिव अर्जुन तापकीर यांच्या उपस्थितीमध्ये निवड करण्यात आली .अध्यक्ष हरिभाऊ वराट, उपाध्यक्ष-ज्ञानेश्वर लबडे ,सचिव -मुक्तार शेख,खजिनदार नाना सावंत, शिउर,सल्लागार - बापूराव वाळुंजकर, शाहुराव जायभाय, अमृत बारवकर, सुदाम कोल्हे, संतोष जोरे, यांची निवड करण्यात आली. महात्मा गांधी रोजगार हमी योजना मनरेगा ही ग्रामीण भागात काम मिळवून देण्याची घटना जनतेला मिळालेली मूलभूत हमी आहे. ग्रामीण गरीबांच्या जीवन मानात सुधारणा घडवून आणणे, स्थलांतर कमी करणे, आणि शेती व जलसंधारणाच्या कामात भरीव योगदान देणे हे या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. रोजगार सहाय्यक योजनेचा कणा रोजगार सहाय्यक हेच मनरेगा योजनेचे कणा यंत्रचालक आहेत. ते गावागावात योजनांची अंमलबजावणी करताना,कामांची मोजणी व नोंद,पात्र लाभार्थ्यांची निवड,डिजिटल हजेरी व मोबाईल अॅप वापर,योजनांचे नियोजन व प्रत्यक्ष कामांचे पर्यवेक्षण अशा अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतात. त्यांची संघटना मजबूत असणे म्हणजे योजनेंच्या दर्जेदार अंमलबजावणीची हमी



## 'तू या रस्त्याने का येतोस' असे म्हणत तरुणावर चाकू हल्ला

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :-** दुचाकीवरून आई-वडिलांना भेटण्याकरिता गेलेल्या तरुणास अडवून, 'तू या रस्त्याने का येतोस', असे म्हणून ६ जणांनी शिवीगाळ दमदाटी करीत लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. त्यातील एकाने चाकूने तरुणाच्या डोक्यात मारून त्याच्या खुनाचा प्रयत्न केला व इतरांनी दगड फेकून मारून दुखापत केली. ही घटना सारसनगर येथील भगवानबाबा चौक येथे मंगळवारी (ता. २२) रात्री ९ वाजता घडली. याबाबत योगेश भागीनाथ तांदळे (वय २५, रा. कानडेमळा, सारसनगर) याने भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी योगेश तांदळे हा आई, वडील यांना भेटण्याकरिता त्याच्या मोटारसायकलवरून भगवानबाबा चौकातून जात असताना ऋषिकेश अशोक बडे, अविनाश विश्वास जायभाय, नितीन किसन लाड, अजित रामदास केकाण, निखिल जायभाय व संतोष विष्णू आहेर (सर्व रा. सारसनगर) यांनी त्यास अडवून 'तू या रस्त्याने का येतोस,' असे विचारले असता त्याने मग काय झाले, असा उलट प्रश्न विचारल्याने ६ जणांना राग आला. त्यांनी आज यास जीवे ठार मारून टाकू, असे म्हणून शिवीगाळ दमदाटी करीत लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

## तरुणांनी आळीपाळीने ३ मुलांवर केला अनैसर्गिक अत्याचार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर:** अल्पवयीन मुलाचे अपहरण आणि अनैसर्गिक अत्याचार प्रकरणाने संपूर्ण राज्यात संताप व्यक्त केला जात आहे. अहिल्यानगरच्या केडगाव परिसरात घडलेल्या घटनेने खळबळ उडाली आहे.रावण नावाच्या ग्रुपने परिसरात दहशत माजवली आहे. गुन्हेगारी विचारांच्या तरुणांनी एकत्र येत हा ग्रुप बनवला आहे. यात जवळपास १० ते १५तरुणांचा सहभाग आहे. काही दिवसांपूर्वी आरोपींनी ३ मुलांचे अपहरण करून टोळक्यातील १० ते १५तरुणांनी आळीपाळीने ३ पिडीतांवर अनैसर्गिक अत्याचार केला. अत्याचार केल्यानंतर आरोपींनी तिघांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला. या गंभीर प्रकरणातील आरोपींना कोतवाली पोलीस ठाण्याच्या पथकाने अटक केली आहे. तरुणांनी केलेले कृत्य उघडकीस आल्यानंतर परिसरात संतापाची तीव्र लाट उसळली आहे. पोलिसांनी तरुणांना धडा शिकवण्यासाठी अटकेनंतर संबंधित आरोपींची गुरुवारी परिसरात धिंड काढण्यात आली आहे.

---

## आखतवाडे ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी ज्ञानेश्वर उगले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**ढोरजळगांव:**-राजकीय दृष्टी महत्वपूर्ण समजल्या जाणाऱ्या आखतवाडे ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी ज्ञानेश्वर रंगनाथ उगले यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. आखतवाडे ग्रामपंचायतीच्या सरपंच वनिता रघुवीर उगले यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने रिक्तपदी सरपंच पदासाठी ज्ञानेश्वर उगले यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवडणूक निर्णायक अधिकारी म्हणुन महसूल मंडळधिकारी फुलमाळी ए ए यांनी काम पाहिले तर त्यांना तलाठी ज्योती ससाणे व ग्रामसेवक महेंद्र डोंगरे यांनी सहकार्य केले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य प्रताप घाडगे, अश्विनी उगले, सुनिता होडशिळ, सोनाली साळवे, सुनिता उगले आदी उपस्थित होते यावेळी बोलताना नवनिर्वाचित सरपंच ज्ञानेश्वर उगले म्हणाले की सरपंच पदाच्या माध्यमातून गावातील विकासाभिमुख कामे करण्यावर भर देण्यात येईल सर्वाना विश्वासात घेऊन विश्वासाला तडा न जाऊ देता काम करण्याची ग्वाही उगले यांनी बोलताना दिली.निवडणूक प्रक्रिया बिनविरोध पार पाडण्यासाठी बाबासाहेब उगले, रघुवीर उगले,होडशिळ गुरूजी, रविंद्र राशिनकर,कुणाल ढोले,विक्रम उगले, अँड बाबासाहेब उगले, बळीराम उगले, आप्पासाहेब पुंडेकर,श्रीकांत उगले, प्रमोद निकाळजे,दिपक साळवे,पोपट राशिनकर,गणेश उगले,सुनिल उगले रामेश्वर उगले ,विक्रम उगले,सुभाष होडशिळ,बाबासाहेब बडे,बाळासाहेब बडे,दिपक उगले,गणेश साळवे,आकाश वाघमारे,पोपट ढाकणे ,मुरलीधर राशिनकर,गणेश राशिनकर,नवनाथ गाढे, महादेव सरोदे, संभाजी मडके, उध्दव उगले, भारत उगले,अशोक देशमुख, पोपट ढाकणे, विकास वाघमारे, आदिनाथ सांगळे, डेंगळे, सरकार ग्रामपंचायत कर्मचारी नितीन बनकर, आण्णा सरोदे, सतोंष झावरे, डॉ भारत तळेकर कोतवाल अनिल साबळे, आदी उपस्थित होते. नवनिर्वाचित सरपंच उगले यांचे निवडीबद्दल आमदार मोनिकाताई राजळे, माजी खासदार सुजय विखे यांनी अभिनंदन केले आहे.




## सामाजिक कार्यकर्ते अॅड. नितेश गायकवाड यांचे अवैध धंदे बंद करण्यासाठी उपोषण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पारनेर :** देवीभोयरे येथील सामाजिक कार्यकर्ते अॅड. नितेश गायकवाड यांनी दारुबंदीच्या मागणीसाठी तसेच परिसरातील अवैध धंदे बंद करण्यासाठी गेली दोन दिवसांपासून पारनेर येथे आमरण उपोषन सुरू केले असून या उपोषनाला ग्रामस्थांमधून वाढता पाठिंबा मिळत आहे. देवीभोयरे परिसरात दारुबंदी तसेच अवैध धंदे बंद होण्यासाठी अॅड. गायकवाड यांनी जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस अधीक्षक, तहसीलदार, पोलीस निरीक्षक तसेच संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांना आठ दिवसांपूर्वी निवेदन पाठवले होते. मात्र संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या निवेदनाची दखल न घेतल्याने त्यांनी दोन दिवसांपूर्वी आमरण उपोषणाचा मार्ग अवलंबला आहे. अॅड. गायकवाड यांनी म्हटले आहे की ,देवीभोयरे व परिसर सधन आहे. याठिकाणी बारावी पर्यंत शिक्षण घेण्यासाठी माध्यमिक विद्यालय आहे. गावात जगदंबा देवीचे मंदिर आहे. या देवीचा नावलौकिक राज्यात असल्याने या ठिकाणी राज्यातील विविध भागांतून भावीक मोठ्या संख्येने येत असतात. मात्र अवैध धंदे विशेष करुण दारु, मटका, जुगार हे धंदे पोलीसांच्या आशिर्वादाने सुरू असल्याने देवीभोयरे सारख्या आर्थीक, सधन गावात तसेच धार्मिक व शैक्षणिक संस्कृती असलेल्या गावात अवैध धंद्याच्या माध्यमातून गुन्हेगारी बोकाळली आहे. या सर्व अवैध धंद्याची माहिती पोलिसांना असूनही त्याचे व अवैध धंदे करणारांचे सलोख्याचे संबंध असल्याने या मिलीभगतमुळे या धंद्याला बरकत आली आहे. यासाठी हे अवैध धंदे बंद न झाल्यास मी आमरण उपोषणाचा मार्ग सोडणार नाही. या धंद्यावर नगर पोलीसांनी तातडीने कारवाई करुण या अवैध धंदे करणारांना जेलची हवा देण्याची मागणी त्यांनी केली आहे. गेली दोन दिवसांपासून आमरण उपोषन सुरू असून अद्याप एकही अधिकारी या ठिकाणी उपोषनाची दखल घेण्यासाठी फिरकला नाही या शासकीय यंत्रणेचा अॅड. गायकवाड यांनी निषेध केला आहे.




---

## गोपाळ मोटे नागरिकांची दिशाभूल करुन जातीय तेढ निर्माण करत आहे : अमीन शेख

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :-** नवीन वक्फ सुधारणा २०२५ च्या कायद्यानुसार वक्फ बोर्ड बाबत निर्णय घेण्याचे अधिकार जिल्हाधिका-यांना देण्यात आले असल्याने वक्फ नोंदणी रद्द करणेसाठी जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव दाखल करण्यात आला आहे. तर स्वतः आ. विक्रम पाचपुते यांनी ही वक्फ नोंदणी रद्द करण्यासाठी मुख्यमंत्र्याकडे प्रस्ताव दिला असुन झालेली प्रक्रिया अधिकृत असुन तथाकथीत यात्रा कमेटीचे गोपाळ मोटे नागरिकांची दिशाभूल करुन जातीय तेढ निर्माण करीत असल्याचा आरोप शेख महंमद बाबा यांचे वंशज ट्रस्ट चे अध्यक्ष आमीन शेख यांनी केला आहे.सन १९९७ साली ट्रस्ट चे नाव बाबाचे वशज विश्वस्त, शेख मलंगबुवा हाफीजबुवा, हुसेन कमालबुवा शेख, नबीलाल बाबा शेख यांनी स्वतः धर्मादाय आयुक्त अ.नगर याच्या कडे शेख महंमद बाबा दर्गाह ट्रस्ट या नावा साठी स्किम दाखल केली. सदर स्कीम ला मा.धर्मादाय आयुक्त अ.नगर यानी १९९९ साली मान्यता दिल्याने शेख महंमद बाबा दर्गाह ट्रस्ट असे नाव झाले. मी ट्रस्ट चे नाव बदलले हा माझेवर होणारा आरोप साफ खोटे आहे.सन २००८ साली शेख महंमद बाबा यांचा इतिहास भावीकांच्या मागणीनुसार पुस्तक रुपाने प्रकाशीत केल्याने मोटे यांनी भावना भडकल्याच्या नावाखाली आम्हालाच मारहाण करुन आमच्या वर खोटे गुन्हे दाखल केले.व बाबांचे वंशज, पुजारी, विश्वस्तांची निवसस्थाने खाली केली त्या मुळे देवस्थान व देवस्थानच्या जमीनी सुरक्षित राहण्यासाठी बोर्ड कडे नोंदणी केली होती.आमचे राहते घरातील सामान बाहेर रस्त्यावर फेकुन आम्हला बेघर करण्यात आले. त्या विरुद्ध आम्ही श्रीगोंदा न्यायालयात न्याय मागीतला मा.न्यायालयाने तथाकथीत यात्रा कमेटीचे गोपाळ मोटे वगैरेना शेख महंमद बाबा ट्रस्ट च्या स्थावर अगर जंगम मिळकती संबंधी त्यांच्या वापरास अगर हक्कास बाधा आणणारे कोणतेही कृत्य करु नये असा मनाई आदेश दि.११/२/२०१० रोजी दिला आहे. तो आदेश आज ही कायम आहे.शेख महंमद बाबा यांनी हिंदू मुस्लीम ऐक्याचे व अखील मानव जातीचे कल्याणाचे, संमतेचे कार्य केले आहे.शेख महंमद बाबांचा उत्सव पुर्वी तीन दिवसाचा होता गोपाळ मोटे यांनी स्वतः आत्मपरीक्षण करावे की, बाबांचा इतिहास बदलण्याचा व देवस्थान ताब्यात घेण्याचा प्रयत्न कोण करीत आहे.सन १९९६ साली गोपाळ मोटे वगैरे यांनी शेख महंमद बाबा ट्रस्ट बरखास्त करावा त्यांची वंशपरंपरा वहीवाट रद्द करावी व त्या ठिकाणी आमची विश्वस्त म्हणून नेमणूक करावी असा अर्ज धर्मादाय आयुक्त अ.नगर यांच्या कडे केला होता तो अर्ज धर्मदाय आयुक्त अ.नगर यांनी फेटाळला तसचे श्री शेख महंमद महाराज देवस्थान उत्सव प्रतिष्ठाण यात्रा समिती नोंदणी अर्ज ६/२००३ सा.धर्मादाय आयुक्त यांनी फेटाळला सन २०२२ साली गोपाळ मोटे व इतर २१ यांनी श्री संत शेख महंमद महाराज देवस्थान यात्रा उत्सव प्रतिष्ठाण ची नोंदणी केली या प्रतिष्ठाणचा आणि शेख महंमद बाबा देवस्थानचा कसलाही कायदेशीर सबंध नाही, मोटे यांचे सामाजीक प्रतिष्ठाण आहे कुंभार गुल्ली येथील मिळकत क्र.२०२ ही त्यांची जागा आहे जनतेची दिशाभूल करुन मोटे वारंवार शेख महंमद बाबा ट्रस्ट च्या कारभारात हरकत अडथळा निर्माण करत असल्याने शेख महंमद बाबा ट्रस्ट चे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. त्या बाबत ट्रस्ट च्या वतीने पुणे धर्मादाय आयुक्त यांच्या कडे अपील दाखल केले असुन त्यामध्ये पुणे धर्मादाय आयुक्त यांनी केलेल्या निर्णया विरुद्ध गोपाळ मोटे यांनी औरंगाबाद हार्यकोर्टात याचीका दाखल केली आहे.

**नवीन वक्फ सुधारणा २०२५ च्या कायद्याअंतर्गत केलेली प्रक्रिया कायदेशीर आहे त्यात तांत्रीक बाब उपस्थित करुन जनतेचा गैरसमज करु नये. तुम्हाला सत्य मानने जड जातय आणि तुमचा जातीय आणि धार्मिक तणाव निर्माण करण्याचा उद्देश आहे. जो शेख महंमद बाबांना कधीही मान्य होणार नाही. गावाशी खेळणाऱ्यांचा महंमद बाबा बंदोबस्त केल्या शिवाय राहणार नाही.- टिळक भोस**

---

## वसतिगृहातील अधिकारी, कर्मचारी व सहायक आयुक्त यांच्यावर कारवाई करा

### शिवसेनेचे तालुकाध्यक्ष मयूर डोके यांचा आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :**गेल्या दोन दिवसापूर्वी जामखेड शहरातील आरोळे वस्ती येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांचे शासकीय निवासी शाळेतील वसतीगृहात विद्यार्थ्यांना बेल्टने जबर मारहाण झाल्यामुळे सदरची घटना ही मानवतेला काळीमा फासणारी घटना असुन सदरचे वस्तीगृह हे भावी पिढी तयार करत आहे की, गुंड तयार करत आहे असा मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे तसेच सदर ठिकाणी सुमारे दोन वर्षापासुन वस्तीगृह अधिक्षक यांची नेमणुक समाज कल्याण सहायक आयुक्त यांनी केलेली नाही सदरची वस्तीगृह अधिक्षकांची रिक्त जागा भरलेली नाही अशी दबक्या आवाजात चर्चा आहे. तसेच सदर शासकीय निवासी वस्तीगृहात निवासी शिक्षकांची नेमणुक असतांना सुध्दा घटना घडते वेळी एकही शिक्षक कसा उपस्थित नव्हता याची सखोल चौकशी करून सदर शिक्षकावर सुध्दा कर्तव्यात कसुर केल्या बद्दल गुन्हे दाखल करण्याची मागणी शिवसेना (उद्धव ठाकरे गट ) तालुकाप्रमुख ॲन्ड .मयूर डोके यांनी तहसीलदार यांना निवेदनाद्वरे केली आहे.येथील शासकीय निवासी वस्तीगृहात इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांनी इयत्ता ८ वी च्या विद्यार्थ्यांना बेल्टने व चापटाने जबर मारहाण करण्यात आली सदर घटनेचा व्हीडीओ सोशल मेडीयावर व्हॅायरल झाला त्या नंतर जामखेड शहारातील नागरिकाकडुन सदर घटनेचा निषेध करण्यात आला परंतु सदरची घटना ही मानवतेला काळीमा फासणारी घटना घडली आहे तसेच सदर शासकीय निवासी वस्तीगृहात देण्यात येणारे भोजना विषयी मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांच्या तक्रारी असुन सदरचे विद्यार्थी हे वस्तीगृहातील शिक्षकांच्या दबावाखाली येवुन कसल्याही प्रकारे तक्रार करण्यास धजावत नाहीत.सदर अशा प्रकारचे अनेक गुन्हे या पुर्वी महाराष्ट्रात घडलेले असुन अनेक विद्यार्थ्यांनी अशा रॅगिंगच्या प्रकारामुळे आपले प्राण गमावावे लागलेले आहेत. सदरचे वस्तीगृहात गोर गरीब शेतकरी, उसतोड कामगार यांची मुले शिकत असुन सदरचे मुलांचे पालकावर सदरचे वस्तीगृहातील अधिकारी दबाव टाकत असुन त्यांना गुन्हे दाखल करण्यापासुन परावृत करीत आहेत सदरचे कृत्य हे अत्यंत बेकायदेशीर बेजबाबदार व गुन्हेगारी स्वरूपाचे आहे. तसेच सदरचे वस्तीगृहातील संबधित येणारे सर्व अधिकारी व कर्मचारी व समाज कल्याण सहाय्यक आयुक्त अहिल्यानगर यांच्यावर कारवाई करण्यासाठी जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांची परवागनी घेवुन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. अन्यथा जामखेड तालुका शिवसेना च्या वतीने मोठ्या स्वरूपात सदर घटने विरुध्द न्याय मागण्यासाठी आंदोलन करण्यात येईल त्यांचे होणारे परिणामाची सर्वस्वी जबाबदारी शासन प्रशासन यांची राहील केलेल्या बेजबाबदार अधिका-यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी निवेदनात ॲड मयूर डोके यांनी केले आहे.



## पहेलगाम येथील हल्ल्याचा मुस्लिम बांधवांकडून निषेध

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा ;-** काश्मीर खोऱ्यातील पहलगामजवळील बायसरण भागात झालेल्या हल्ल्याचा श्रीगोंदा तालुक्यातील मुस्लिम बांधवांकडून हल्ल्यात बळी पडलेल्या २६ बांधवाना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात येऊन काळ्या पट्ट्या बांधून तहसील कार्यालयात घोषणाबाजी करत निवेदन देऊन निषेध नोंदविण्यात आला . तसेच केंद्र सरकारने दहशतवादी संघटनांच्या विरोधात कठोर भूमीत घेत देशांच्या शांततेवर घाला घालणाऱ्या कोणत्याही मानवाला कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी तालुक्यातील मुस्लिम बांधवांकडून करण्यात आली आहे .



## जीवनात आई-वडील व शिक्षक यांना आदराचे स्थान : काळे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री


**ढोरजळगांव:**-जीवनात आई-वडील व शिक्षक यांना आदराचे स्थान दिले पाहिजे. सत्कार समारंभासाठी अवास्तव खर्च न करता, त्या खर्चातून पुस्तके विकत घ्यावीत व वाचनाचा व्यासंग वाढवावा. तसेच, विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून दूर राहावे, असे प्रतिपादन शिवशाहीर कल्याण महाराज काळे यांनी बोलताना केले.ढोरजळगांव ता शेवगाव येथील श्रीराम विद्यालयात उन्हाळी क्रीडा शिबिर व बालसंस्कार वर्गाचा शुभारंभ खो-खो या क्रीडा स्पर्धेने झाला. या स्पर्धेचे उद्घाटन विद्यालयाचे प्राचार्य संजय चेमटे यांच्या हस्ते, तर बालसंस्कार वर्गाचे उद्घाटन हभप व शिवशाहीर कल्याण काळे महाराज यांच्या शुभहस्ते करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते.बोलताना प्राचार्य संजय चेमटे म्हणाले की ''आम्ही लहान असताना असे संस्कार शिबिर होत नव्हते. आज या बालसंस्कार शिबिराची गरज का वाटते, तर पूर्वी आजी-आजोबा हे चालतं बोलतं शैक्षणिक व्यासपीठ होते. आता विभक्त कुटुंबपद्धती आल्यामुळे व घरे विभक्त झाल्यामुळे, अशा शिबिरांची नितांत आवश्यकता आहे.''यावेळी विद्यालयाचे पर्यवेक्षक सुनील जायभाये , ज्येष्ठ शिक्षक कल्याण राऊत , शंकर खोले , अशोक जाधव ,अमोल भालसिंग , विनोद फलके , सुमित म्हस्के, ज्येष्ठ शिक्षिका सविता सातपुते , माधुरी जाधव , सरला दिवटे , विमल पवार , कविता लोखंडे , स्वाती गरड , कोमल केदार , संतोष अकोलकर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समर कॅम्प विभाग प्रमुख राम काटे यांनी विशेष परीश्रम घेतले. क्रीडा शिबिरात आणि बालसंस्कार वर्गात अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले होते.




## पाथर्डी तालुक्यातील १०८ ग्रामपंचायतींसाठी सरपंचपदाचे आरक्षण जाहीर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी:** तालुक्यातील १०८ ग्रामपंचायतींसाठी सरपंच जातनिहाय आरक्षण बुधवारी तर शुक्रवारी पन्नास टक्के महिला आरक्षण पार पडले.पाथर्डी तहसील कार्यालयात प्रांत अधिकारी प्रसाद मते,तहसीलदार उद्धव नाईक यांनी ही प्रक्रिया शांततेत व पारदर्शकपणे पार पडली. यावेळी नायब तहसीलदार भानुदास गुंजाळ, दिग्विजय पाटील,आप्पासाहेब शिंदे उपस्थित होते. ग्रामपंचायत सरपंच जातनिहाय व महिला पुरुष आरक्षण पुढीलप्रमाणे - अनुसुचित जाती एकुण ८ पदे: महिला राखीव - सोमठाणे खु,घाटशिरस,आल्हणवाडी तोंडोळी तर मिडसांगवी,शिरसाठवाडी,कडगांव,मोहटे हे व्यक्ती राखीव झाले आहेत. अनुसुचित जमाती एकूण २ पदे - अंबिकानगर(महिला राखीव) व कासार पिंपळगांव(व्यक्ती राखीव). नागरीकांचा मागास प्रवर्ग एकुण २९ पदे महिला राखीव: शंकरवाडी,देवराई,अकोला,जवखेडे खालसा,हनुमान टाकळी, चतळी,मढी ,दुलेचांदगाव,खांडगाव,मोहोज खु,भुतेटाकळी,पत्र्याचा तांडा,मोहोज बु,कामत शिंगवे,चिचोंडी. व्यक्ती राखीव: - निपाणी जळगाव,बोरसेवाडी,सैदापुर, जोगेवाडी,वाळुंज,मुंगूसवाडे,येळी,ढवळेवाडी,कोपरे,चिंचपुर पांगुळ,सांगवी बु,सोमठाणे नलवडे,तिसगाव,मांडवे इत्यादी. सर्वसाधारण (खुला) प्रवर्ग एकुण ६९ पदे:-महिला राखीव पुढीलप्रमाणे - टाकळी मानुर,आडगाव,आगसखांड, भालगाव, भारजवाडी,भिलवडे,चिंचपुरइजदे,चितळवाडी, डांगेवाडी, ढाकणवाडी,डोंगरवाडी,एकनाथवाडी, घुमटवाडी,गितेवाडी, जांभळी करोडी,कौडगाव,खरवंडी कासार, कोल्हार, लांडकवाडी, मालेवाडी,निवडुंगे,पाडळी,पा. पिंपळगाव ,पिंपळगाव टप्पा,रांजणी,रेणुकाईवाडी,शिराळ,शिरापुर, तिनखडी,वडगाव,राधोहिवरे,सातवड, खेर्डे,पिरेवाडी इत्यादी. व्यक्ती राखीव पुढीलप्रमाणे -चुंभळी,औरंगपुर,भोसे, दगडवाडी,डमाळवाडी, धामणगाव, धनगरवाडी, धारवाडी, हत्राळ, जवखेडे दुमाला, जवळवाडी,जिरेवाडी,कळसपिंप्री, करंजी,कारेगाव, केळवंडी,कोळसांगवी,कोरडगाव ,लोहसर,माळी बाभुळगाव,माणिदौंडी,मिरी,नांदुर निंबादैत्य,पिंपळगव्हाण, साकेगाव,शेकटे,शिंगवे केशव, सोनोशी,सुसरे,वैजु बाभुळगाव,जाटदेवळे, मोहरी,मोहोज देवढे,पारेवाडी इत्यादी. या आरक्षण सोडवतेसाठी महसुली यंत्रणेतील दादासाहेब वावरे, दीपक मीरपगार आदींनी साह्य केले.



दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

शनिवार दि.२६ एप्रिल २०२५ पान नं.६

## लग्नाचे आमिष दाखवून विवाहितेची फसवणूक
## नांदुर्खी येथील तरुणाच्या विरोधात ठाण्यात गुन्हा दाखल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहाता :** तू तुझ्या नवऱ्याला घटस्फोट दे. आपण लग्न करु. मी तुला सुखात ठेवेन. तुझ्या मुलाची चिंता करू नको असे लग्नाचे आमिष दाखवून ठाणे येथील एका विवाहितेची राहाता तालुक्यातील नांदुर्खी येथील एका इसमाने फसवणूक करत शिर्डी, नाशिक, पुणे, अहिल्यानगर, कराड अशा विविध ठिकाणी नेऊन तिच्या सोबत शारीरिक संबंध केले. विवाहितेने लग्नाचा लकडा लावताच त्याने पोबारा केला.

सविस्तर वृत्त असे की, नांदुर्खी येथील मुकूंद भानुदास बिडवे (वय ४२) याने विवाह संस्थेच्या संकेतस्थळावरुन ठाण्यातील एका विवाहितेस लग्नासाठी रिक्वेस्ट पाठवली. त्या महिलेस १० वर्षाचा एक मुलगा असून बिडवे म्हणाला की तु तुझ्या नवऱ्याला घटस्फोट दे. घटस्फोटाची प्रक्रिया किचकट असल्याने लवकर घटस्फोट होत नाही याचा गैरफायदा घेऊन त्याने तिला जाळ्यात अडकवले. नंतर त्याने तिच्याकडे पैशाची मागणी सुरू केली. गोड बोलून विविध गावांना नेऊन शारीरिक संबंध प्रस्थापित केले. विवाहितेने लग्नाचा जास्त आग्रह केल्याने मुकुंद बिडवे फरार झाला. त्यात त्याला त्यांचे कुटुंबीय मदत करत असल्याचा आरोप विवाहितेने केला आहे. आता त्याच्या घरचे लोक यावर पडदा टाकण्याचा प्रयत्न करत आहे. मात्र विवाहितेने ठाण्यातील कोपरी पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यावरून पोलिसांनी मुकुंद भानुदास बिडवेविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक रोहिणी नरशिंगे करीत आहे.

## दुचाकीवरील तरुणाचा अपघाती मृत्यू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** आजोबांचा अंत्यविधी करुन मोटारसायकलवर घरी जात असलेल्या चैत्यन्य भांड या २० वर्षीय तरुणाचा अपघात होऊन तो जागीच ठार झाला. ही घटना तालुक्यातील लाख येथे २४ एप्रिलला दुपारच्या सुमारास घडली.

श्रीरामपूर तालुक्यातील लाडगाव येथे राहणाऱ्या चैत्यन्य आईचे वडील म्हणजे आजोबा राहुरी तालुक्यातील टाकळीमियॉं येथे राहत होते. ते २३ एप्रिलला मयत झाले होते. चैत्यन्य आजोबांच्या अंत्यविधीसाठी टाकळीमियॉं येथे आला होता. त्यानंतर घरी परत जाता असताना तालुक्यातील लाख परिसरात त्याच्या मोटारसायकलचा अपघात होऊन तो रस्त्याच्या कडेला असलेल्या साईड गटारात पडला आणि त्याचा जागीच मृत्यू झाला. रुग्णवाहिका चालक रविंद्र देवगीरे यांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने चैतन्यला राहुरी येथील ग्रामीण रुग्णालयात आणले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याला तपासून उपचारा पूर्वीच मयत झाला असल्याचे घोषित केले.

## पती-पत्नीला लाथाबुक्क्यांनी मारहाण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** तुम्ही घर बांधत आहेत तर तुमच्या घराच्या बांधकामाचे पाणी बाहेर येऊ देऊ नका, असे म्हणाल्याचा राग आल्याने आरोपींनी पती-पत्नीला शिविगाळ करुन लाकडी दांडा व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. ही घटना शहरातील जोगेश्वरी आखाडा येथे २१ एप्रिलला सायंकाळच्या सुमारास घडली. अश्विनी पांडुरंग भोंगळ (वय २६ वर्षे, रा. जोगेश्वरी आखाडा, राहुरी) यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, २१ एप्रिलला सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास त्या, त्यांचे पती व सासू हे घरी असताना आरोपी तेथे आले. त्यावेळी अश्विनी भोंगळ त्यांना म्हणाल्या की, तुम्ही घर बांधत आहेत तर तुमच्या घराचे पाणी बाहेर येऊ देऊ नका, असे म्हणाल्याचा त्यांना राग आल्याने त्यांनी अश्विनी भोंगळ व त्यांचे पती पांडुरंग या दोघांना शिविगाळ केली. तसेच लाकडी दांडा, वीट व लाथाबुक्यांनी मारहाण केली. तसेच पुन्हा आमच्या नादी लागले तर तुम्हाला जिवंत सोडणार नाही, अशी धमकी दिली. फिर्यादीवरून राहुरी पोलीस ठाण्यात आरोपी नामदेव मच्छिंद्र गाडे, अप्पा गोरक्षनाथ गाडे, ज्ञानदेव गोरक्षनाथ गाडे, (सर्व रा. जोगेश्वरी आखाडा, राहुरी) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे हे करीत आहेत.

## किरकोळ कारणावरुन चुलता व पुतण्याला मारहाण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** पत्रे ठोकण्याच्या कारणावरुन आरोपींनी चुलता व पुतण्याला शिवीगाळ करुन लाकडी दांडा, कुऱ्हाड व लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना शहरातील जोगेश्वरी आखाडा येथे २१ एप्रिलला सायंकाळच्या सुमारास घडली आहे. याबाबत आप्पासाहेब गोरक्षनाथ गाडे (वय २९ वर्षे, रा. जोगेश्वरी आखाडा, राहुरी) यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, २१ एप्रिलला सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास अप्पासाहेब गाडे यांचे चुलते मच्छिंद्र गाडे व पांडुरग भोंगळ यांचे वाद सुरु होते. त्यावेळी आप्पासाहेब गाडे त्यांना समजावून सांगत असताना तेथे आरोपी आले. तेव्हा आरोपींनी आप्पासाहेब गाडे व त्यांचे चुलते मच्छिंद्र गाडे या दोघांना शिवीगाळ करुन लाकडी दांडा, कुऱ्हाड व लाथाबुक्याांनी मारहाण केली. तसेच पुन्हा आमच्या नादी लागले तर तुम्हास जिवंत सोडणार नाही, अशी जीवे ठार मारण्याची धमकी दिली. फिर्यादीवरून राहुरी पोलिस ठाण्यात आरोपी पांडुरंग दतात्रय भोंगळ, निखील राजेंद्र भोंगळ, अश्विनी पांडुरंग भोंगळ, मिठ्ठु राजेद्र भोंगळ (सर्व रा. जोगेश्वरी आखाडा, राहुरी) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## संगमनेर कृषी उत्पन्न बाजार समिती जिल्ह्यात प्रथम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली असलेल्या संगमनेर कृषी उत्पन्न बाजार समितीला महाराष्ट्र शासनाच्या पणन विभागाच्या वतीने स्मार्ट प्रकल्पांतर्गत गुणवत्तेच्या क्रमवारीत अहिल्यानगर जिल्ह्यातून प्रथम क्रमांक तर नाशिक विभागातून द्वितीय क्रमांक मिळाला असल्याची माहिती सभापती शंकरराव खेमनर व सचिव सतीश गुंजाळ यांनी दिली आहे.

महाराष्ट्र सरकारच्या पणन विभागाच्या वतीने बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पांतर्गत राज्यातील ३०५ बाजार समित्यांची वार्षिक क्रमवारी प्रमाणित केली आहे. यामध्ये प्रपत्र व सहाय्यक निबंधक यांनी तपासणी करून निकषानुसार गुणांकन केले आहे. यामध्ये २०२३ - २४ साठी महाराष्ट्र राज्यातून संगमनेर कृषी उत्पन्न बाजार समितीला अहिल्यानगर जिल्ह्यातून प्रथम क्रमांक तर नाशिक विभागातून द्वितीय क्रमांक मिळाला आहे.

थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर कृषी उत्पन्न बाजार समितीने शेतकरी, व्यापारी या सर्वांना अत्यंत अत्याधुनिक सुविधा दिल्या आहेत. संगणकीय कामकाज, उपबाजार समित्यांचे कामकाज, स्वच्छता, कामकाजावरील विश्वास अशा सर्व सुविधा या सर्व निकषांमध्ये उत्कृष्ट कारभार केल्याने सलग दुसऱ्या वर्षी संगमनेर कृषी उत्पन्न बाजार समितीला हा प्रथम क्रमांक मिळाला आहे.

थोरात यांच्या नेतृत्वाखाली बाजार समितीच्या वाटचालीत सभापती शंकरराव खेमनर, उपसभापती गीताराम गायकवाड, संचालक कैलास पानसरे, सुरेश कान्होरे, सतीश खताळ, मनीष गोपाळे, अरुण वाघ, विजय सातपुते, सुधाकर ताजणे, सखाराम शेरमाळे, अनिल घुगे, निलेश कडलग, संजय खरात, मनसुख भंडारी, निसार शेख, सचिन करपे, दीपाली वरपे, रुक्मिणी साकुरे, सचिव सतीश गुंजाळ आदींनी सातत्यपूर्ण काम केले आहे.

बाजार समितीला मिळालेल्या या पुरस्काराबद्दल बाळासाहेब थोरात, मा. आमदार डॉ. सुधीर तांबे, आमदार

### नाशिक विभागात द्वितीय



सत्यजित तांबे, ॲड माधवराव कानवडे, दुर्गाताई तांबे, बाबासाहेब ओहोळ, रणजितसिंह देशमुख, डॉ. जयश्री थोरात, इंद्रजीत थोरात, संपतराव डोंगरे, सुधाकर जोशी, रामहरी कातोरे, बाजीरावखेमनर, हौशीराम सोनवणे, राजेंद्र गुंजाळ, आदींसह सर्व पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.


## जिल्हा परिषदेच्या शाळेला ९ हजार ९९९ रुपयांचा निधी देऊन मुलाचा वाढदिवस साजरा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निघोज:** परिसरातील तनपुरे वस्ती जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी पार्थ विष्णू सोजे याचा वाढदिवस शाळेत शिक्षक व विद्यार्थी यांनी अत्यंत साधेपणाने साजरा केला. यावेळी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना चॉकलेट देऊन विद्यार्थ्यांना खूष केले. पार्थ याचे वडील विष्णू सोजे या सर्वसामान्य शेतकऱ्याने मात्र शाळेचा लौकिक व पार्थ याला कोनत्याही प्रकारचे खाजगी शिकवण न लावता शाळेच्या शिक्षकांच्या गुणवत्तेवर पार्थ हा हुशार विद्यार्थी आहे. यासाठी विष्णू सोजे यांनी शाळेतील विद्यार्थी विकासासाठी ९ हजार ९९९ रुपयांची देणगी देत शाळेतील विद्यार्थी व शिक्षक यांच्या प्रती स्नेहभाव व्यक्त केला आहे. यावेळी पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्ताजी उनवणे, पारनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष बाबाजी वाघमारे, पारनेर तालुका प्रेस फोटोग्राफर संघटनेचे पदाधिकारी जयसिंग हरेल, विष्णू सोजे, संदीप ढोणे, , शिक्षीका मंगल भुकन , श्रीमती मोरे , श्रीमती बेलोटे , श्रीमती धामणे आदी तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.यावेळी विष्णू सोजे यांनी रकमेचा धनादेश सुधामती कवाद यांच्या हस्ते मुख्याध्यापक बस्नी गुंड सर व शिक्षक सहकाऱ्यांकडे दिला. यावेळी तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष मंगेशशेठ लाळगे यांच्या हस्ते पार्थ व सोजे यांचा सत्कार करण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला आघाडीच्या जिल्हा कार्याध्यक्षा सुधामती कवाद यावेळी म्हणाल्या तनपुरे वस्ती शाळा प्रगतीच्या बाबतीत अव्वल दर्जाची आहे. सर्वसामान्य शेतकरी विष्णू सोजे यांनी वाढदिवस निमित्ताने खर्चाला फाटा देत मुलगा पार्थ याचा शैक्षणिक अभिमान जपण्याचे काम या निमित्ताने केले आहे. तंटामुक्ती समिती अध्यक्ष मंगेशशेठ लाळगे यावेळी म्हणाले तनपुरे वस्ती ग्रामस्थांनी या शाळेला भरभरून मदत केली आहे कारण या शाळेची गुणवत्ता नंबर एक आहे. निघोज आणी परिसरातील सर्व जिल्हा परिषद शाळांचा दर्जा उंचावलेला आहे. हा शैक्षणिक आलेख उच्च दर्जाचा असल्याने या वर्षी जिल्हा परिषद शाळांमध्ये प्रवेश घेण्यासाठी गर्दी होणार आहे यासाठी कोणत्याही प्रकारची मदत लागल्यास ती करण्यासाठी ग्रामस्थ तयार असून शिक्षकांनी सर्वाधिक विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठी परिश्रम घेण्याची गरज आहे. शिक्षक मच्छिंद्र दिवसे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी मुख्याध्यापक बन्सी गुंड यांनी आभार मानले.

## आमदार शिवाजीराव गर्जे यांची विधानपरिषदेतील समितीवर निवड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**पाथर्डी:** तालुक्याचे सुपुत्र व महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य आमदार शिवाजीराव गर्जे यांची सन २०२४-२०२५या वर्षासाठी विधान परिषद समित्यांवर महत्त्वपूर्ण पदांवर वर्णी लागल्याने तालुक्यात आनंदाचे वातावरण आहे.विधान परिषद सभापती प्रा.राम शिंदे यांनी घोषित केलेल्या या समित्यांमध्ये गर्जे यांना महत्त्वाच्या जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत. आमदार गर्जे यांची निवड सार्वजनिक उपक्रम समिती, ग्रंथालय समिती तसेच सदस्यांचे वेतन व भत्ते याबाबतची संयुक्त समिती यांसारख्या महत्त्वपूर्ण समित्यांवर झाली आहे.या निवडीमुळे विधानमंडळाच्या कामकाजात त्यांच्या योगदानाला अधिक बळ मिळणार आहे.विशेष म्हणजे,सार्वजनिक उपक्रम समिती व ग्रंथालय समितीच्या प्रमुखपदी खुद्द सभापती प्रा.राम शिंदे असून, त्याच समित्यांमध्ये आमदार गर्जे यांना संधी देण्यात आल्याने त्यांच्यावर दाखवलेल्या विश्वासाची पावती मिळाली आहे. विधान परिषदेमध्ये समिती पद्धतीला संसदीय लोकशाहीत अनन्यसाधारण महत्त्व आहे. निःसत्र कालावधीत देखील या समित्यांच्या माध्यमातून कायदेमंडळ कार्यकारी मंडळावर नियंत्रण ठेवते,जे सत्तानियंत्रण व सत्तासंतुलन या राज्यघटनेतील तत्त्वांना पूरक ठरते.

## अव्यहार्य अंशदान योजनेचा फेरविचार करणार : काका कोयटे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव शहर :** राज्यातील सहकारी पतसंस्थांच्या ठेवींना संरक्षण देण्यासाठी जाहीर केलेली अंशदानाची योजना अव्यवहार्य असल्यामुळे ती रद्द करण्याच्या मागणीला मान्यता देण्यात आली सहकारी पतसंस्थांकडून अंशदान घेण्याबाबत फेरविचार करणार आहे. सध्या राज्यातील सहकारी पतसंस्थांनी अंशदान द्यावे यासाठी आग्रही राहणार नाही, असे बैठकीच आश्वासित केल्याची माहिती महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांनी दिली.मंत्री पाटील यांनी मंत्रालयात बोलविलेल्या बैठकीत राज्यातील सहकारी पतसंस्था चळवळ सक्षम व सुदृढ होण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आल्याचे कोयटे म्हणाले. बैठकीला नागपूरचे आमदार कृष्णाजी खोपडे, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, सहकार आयुक्त दीपक तावरे, अपर आयुक्त श्रीकृष्ण वाडेकर, सहकार खात्याचे निबंधक मिलिंद सोबले आदींची प्रमुख उपस्थिती होती. तसेच राज्य फेडरेशनचे संस्थापक वसंतराव शिंदे, उपाध्यक्ष शांतीलाल शिंगी, संचालक चंद्रकांत वंजारी, सर्जे राव शिंदे, राजाभाऊ देशमुख, कार्यकारी संचालिका सुरेखा लवांडे या बैठकीला उपस्थित होत्या. काका कोयटे म्हणाले की, आरोग्य मंत्री काश आबिटकर यांनी राज्यातील सहकारी पतसंस्थांच्या ठेवींना संरक्षण देण्यासाठी जाहीर केलेली अंशदानाची योजना अव्यवहार्य असल्यामुळे ती रद्द करावी अशी मागणी केली. आरोग्यमंत्र्यांनी केलेल्या मागणीला उत्तर देताना सहकार आयुक्त दीपक तावरे म्हणाले की, आबिटकर यांची मागणी आणि राज्य फेडरेशनने बैठकीत निदर्शनास आणून दिलेल्या विविध मुद्यांमुळे आम्ही राज्यातील सहकारी पतसंस्थांकडून अंशदान घेण्याबाबत फेरविचार करणार आहे. सध्या राज्यातील सहकारी पतसंस्थांनी अंशदान द्यावे यासाठी आग्रही राहणार नाही. बैठकीमध्ये पतसंस्थांच्या विविध विषयांवर चर्चा झाली. विशेषतः सहकार खात्याकडून १०१ चे दाखले तातडीने दिले जावेत. अपसेट प्राईसचे प्रस्ताव तातडीने मंजूर केले जावेत. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून थकीत कर्जदारांच्या मालमत्तेचे ताबे त्वरित दिले जावे. या विषयांबाबत देखील सहकार खाते परिपत्रक काढणार असल्याचे सांगितले. थकीत थकबाकीदाराची मालमत्ता जप्त केल्यानंतर सहकार खात्याकडून अपसेट प्राईस मंजूर करून घ्यावी लागते. ही प्रक्रिया थकबाकीदारांना मान्य होत नाही. यावर उपाय म्हणून थकबाकीदारांनी मागणी केलेल्या १ महिन्याच्या आत मालमत्ता विकण्याची परवानगी द्यावी. परंतु थकबाकीदाराला अपेक्षित असलेल्या किमतीत मालमत्ता विकली न गेल्यास सहकारी पतसंस्थांनी मागणी केलेल्या किमतीत अपसेट प्राईस देता यावी.अशा प्रकारचा निर्णय देखील यावेळी घेण्यात आल्याचे कोयटे यांनी सांगितले.

### मंत्रालयात झालेल्या बैठकीत निर्णय



### सोने तारण कर्ज वाढवावे

**राज्यातील सहकारी पतसंस्थांनी सोने तारण कर्ज वाढवावे. कारण हे सोने तारण कर्ज जगात अतिसुरक्षित आहे. तारण असलेले सोने हे पतसंस्थांच्या ताब्यात असते. त्यामुळे सोने तारण कर्जाच्या वसुलीची हमी सहकारी पतसंस्थांना मिळते. त्यामुळे सोने तारण कर्ज वाढीवर पतसंस्थांनी भर द्यावा, असे आग्रही सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले. सहकारी पतसंस्थांना विशेषतः महिला बचत गटाच्या वस्तू विक्री करून देण्याची परवानगी दिली असल्याचे पाटील यांनी जाहीर केले.**


**गत ३ वर्षात अंशदान भरण्याबाबत सहकार खात्याने तब्बल ५ परिपत्रके काढली होती. परंतु राज्य फेडरेशनच्या संमतीशिवाय आम्ही अंशदान देणार नाही असा निर्णय राज्यातील सहकारी पतसंस्थांनी घेतला होता. मंत्रालयात झालेल्या बैठकीत हा निर्णय सहकार खात्याला मागे घ्यावा लागला. हा राज्यातील सहकारी पतसंस्थांच्या एकजुटीचा विजय आहे**

**- काका कोयटे, अध्यक्ष**

## सांघिक कामगिरीचा अभाव व तगडा फिनिशर नसल्यामुळे राजस्थानचा पराभव


### घरच्या मैदानावर आरसीबीचा पहिला विजय, ११ धावांनी राजस्थानला नमवले

क्रिकेट हा सांघिक खेळ आहे. कोणा एकाच्या चांगल्या फलंदाजीने व गोलंदाजीने एखादा सामना एकहाती जिंकता येतो. मात्र जर निरंतर यश मिळवायचे असेल तर संघातील ११ खेळांडूंनी आपले योगदान देणे आवश्यक असते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे मुंबई इंडियन्स संघ. सुरवातीला सतत पराभवाचे तोंड पाहिले लागल्यानंतर मुंबईचा संघ एकवटला. आणि त्यानंतर त्यांनी जोरदार पुनरागमन करत विजयाचा चौकार मारला. या विजयात फलंदाजांबरोबच गोलंदाजांनीही तोलामोलाची साथ देत विजयात आपला वाटा उचलला. त्यामुळे सुरवातीला मुंबईच्या सुपर फोरच्या आशा खूप धुसर झाल्या होत्या. मात्र सध्या गुणतालिकेत ते चौथ्या स्थानवर आहेत. याउलट परिस्थिती राजस्थानची आहे. राजस्थानकडे सामना फिनिश करणारा तगडा फिनिशीर नसल्यामुळे राजस्थानला तीन-चार सामन्यात तोंडाजवळ आलेला विजयाचा घास घेता आला नाही. नियमित कर्णधार संज सॅमसन दुखापतीमुळे बाहेर असल्याने राजस्थानची फलंदाजी कमकुवत भासत आहे. सलामीवीर यशस्वी जयस्वाल एकटा धावा करत आहे. मात्र चांगल्या सुरूवातीनंतरही राजस्थानच्या मधल्या फळीतील फलंदाजांना सामन्याचे विजयात रुपांतर करण्यात अपयश येत आहे. किमान तीन सामने असे होते की, ज्यात राजस्थानचा विजय निश्चित मानला जात होता. दिल्लीविरुद्धच्या सामन्यात शिमरॉन हेटमायर व ध्रुव जुरेल यांना शेवटच्या शटकात जिंकण्यासाठी हव्या असलेल्या १० धावा करता आल्या नाहीत. त्यामुळे सामना सुपर ओव्हमध्ये गेला. मात्र सुपर ओव्हमध्येही त्यांना अपयश आले. त्यामुळे हा सामना त्यांच्या हातून निसटला. अगदी असाच लखनऊविरुद्धचा सामनाही त्यांनी गमावला. शेवटच्या षटकात जिंकण्यासाठी केवळ नऊ धावा हव्या होत्या. यावेळीही मैदानावर ध्रुव जुरेल व हेटमायर होते. मात्र लखनऊचा गोलंदाज आवेश खानने अवघ्या नऊ धावाही त्यांना करू दिल्या नाहीत. त्यामुळे याही सामन्यात विजयाचा घास त्यांना घेता आला नाही. गुरुवारी झालेल्या सामन्यातही यशस्वी जयस्वालने २००च्यावर धावांच्या आव्हानांचा पाठलाग करताना आक्रमक व चांगली सुरूवात करून दिली होती. मात्र मधल्या फळीतील फलंदाजांकडून त्याला साथ मिळाली नाही. राजस्थानला शेवटच्या दोन षटकात म्हणजे १२ चेंडूत २८ धावा हव्या होत्या. यावेळीही हेटमायर व जुरेल मैदानावर होते. मात्र त्यांना सामना फिनिश करता आला नाही. १९ व्या षटकात जॉस हेजलवूडने या दोघांनाही बाद करत सामना आरसीबीच्या बाजूने फिरवला. संघात उत्कृष्ट फिनिशर नसल्यामुळे तीन-चार सान्यात राजस्थान विजयाच्या समीप असूनही त्यांना त्याचे विजयात रुपांतर करता आले नाही. जोफ्रा आर्चर सोडला तर राजस्थानची गोलंदाजीची बाजूही थोडीशी कमकुवत भासत आहे. एकहाती सामना फिरवण्याची ताकद असलेल्या गोलंदाजाची राजस्थानला नक्कीच उणीव जाणवत असेल. गुरूवारी आरसीबीबरोबर झालेल्या सामन्यातही राजस्थानच्या फलंदाजांच्या आणि गोलंदाजांच्या उणिवा समोर आल्या. घरच्या



मैदानावर या मोसमात आरसीबीली एकही विजय मिळवता आला नव्हता. मात्र राजस्थानला पराभूत करून घरच्या मैदानावर हारण्याची परंपरा त्यांनी खंडित केली. राजस्थानला त्यांनी ११ धावांनी पराभूत केले.

आरसीबीविरुद्धच्या सामन्यात कर्णधार रियान परागने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र घरच्या मैदानावर जिंकायचे असेल तर किमान २०० धावा फलकावर लावायच्या या उद्देशाने आरसीबीचे सलामीवीर रनमशीन विराट कोहली व फिल सॉल्ट यांनी जोरदार सलामी दिली. या दोघांनी पहिल्या गड्यासाठी ६१ धावांची भागिदारी केली. सॉल्ट बाद झाल्यानंतर देवदत्त पडिकलने कोहलीला उत्कृष्ट साथ देत धावगती कमी होणार नाही, याची काळजी घेत शानदार फलंदाजी केली. दरम्यान कोहलीने ३२ चेंडूत अर्धशतकी पल्ला गाठला. त्याचे या मोसमातील हे पाचवे अर्धशतक आहे. या दोघांनी दुसऱ्या गड्यासाठी ९५ धावांची भागिदारी केली. जोफ्रा आर्चरने कोहलीला बाद करून ही जोडी फोडली. मात्र बाद होण्यापूर्वी कोहलीने ४१ चेंडूत ७० धावा चोपून काढल्या. त्यात त्याने ८ चौकार आणि दोन षटकार मारले. पडिकलने या हंगामातील पहिले अर्धशतक झळकावले. निर्धारित २० षटकात आरसीबीने ५ गडी गमावून २०५ धावा उभ्या केल्या.




२०६ धावांच्या विजयी आव्हानाचा पाठलाग करताना राजस्थाने दमदार सुरूवात केली. यशस्वी जायसवाल आणि वैभव सूर्यवंशी यांनी पहिल्या पहिल्या गड्यासाठी २६ बॉलमध्ये ५२ धावांची भागीदारी केली. नवख्या सूर्यवंशीला अनुभवी भुवनेश्वर कुमारने बाद केले. वैभवने २ षटकारांच्या मदतीने १२ चेंडूत १६ धावा केल्या. यशस्वी जायसवाल अतिशय तुफानी फलंदाजी करत होता. मात्र तो एका धावेमुळे अर्धशतकापासून दूर राहिला. यशस्वीने १९ बॉलमध्ये ४९ धावा केल्या. यशस्वी बाद झाल्यानंतर कर्णधार रियान पराग आणि नितीश राणा यांनी तिसऱ्या गड्यासाठी ३८ धावांची भागिदारी केली व धागतीही नियंत्रणात ठेवली होती. मात्र हे दोघेही कृणाल पांड्याच्या फिरकीत अटकले. रियान परागने १० चेंडूत २२ धावा तर नितीश राणाने २२ चेंडूत २८ धावा केल्या. हे दोघे बाद झाल्यानंतरही जुरलेने शाननदार फलंदाजी करत विजय जवळ आणला होता. राजस्थानला शेवटच्या १२ चेंडूत २८ धावा हव्या होत्या. मात्र जोश हेझलवूडने हेटमायर व जुरेलला एकाच षटकात बाद केल्याने राजस्थानला ११ धावांनी पराभव स्वीकारावा लागला.